म. ग्रं. सं. ठाणे
विषय निबंध
सं. क्र. १५५५

# नैतिकता आणि कायदा

REFBK-0013760
REFBK-0013760

वि. न. गाडगीळ

3૭૯22
સં.શા.
ધરાધ્યુ
૧૫૫૫
નિબંધ

# अश्लीलता आणि कायदा

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम 36622 वि: निबंध
क्रमांक 9455 नोंद दि: ...

श्री. वि. न. गाडगीळ
बी. ए., बी. एस्‌सी. (लंडन), बार–ॲट–लॉ

93760
REFBK-0013760

व्हीनस प्रकाशन : पुणें

आवृत्ति पहिली
मे १९६४

प्रकाशन
स. कृ. पाध्ये
व्हीनस प्रकाशन
त प श्च र्या
३८१ क, शनिवार पेठ : पुणें २

मुद्रक
दा. त्र्यं. जोशी
चित्रशाळा प्रेस,
५६२ सदाशिव पेठ : पुणें २

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.

*माझे कायद्यांतले गुरु सांदिपनी*

**बॅ. यशवंतराव रेगे**

*यांना सादर*

*अर्पण*

" No argument for the Suppression of obscene literature has ever been offered which, by unavoidable implication, will not justify and which has not already justified every other limitation that has ever been put upon mental freedom. "

*Theodore Schroeder–*

**' Obscene Literature and Constitutional Law'**

# प्रस्तावना

१९५८ सालीं दादर येथें मुंबई व उपनगरसाहित्यसंमेलन, संमेलन संघटित करणाऱ्यांपैकीं मी एक होतों. या संमेलनांत अश्लीलतेबद्दलचा एक ठराव बराच गाजला. त्यानंतर कायद्याच्या दृष्टीनें या विषयासंबंधीं कांहीं वाचन मीं केलें. त्यासंबंधीं कांहीं लेख लिहिले, भाषणें दिलीं, आणि मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयातर्फे या विषयावर भरविण्यांत आलेल्या परिसंवादांतहि भाग घेतला. या निमित्तानें जमविलेली माहिती मराठी वाचकांना करून द्यावी या उद्देशानें हें पुस्तक प्रसिद्ध करीत आहे.

अश्लीलतेसंबंधींच्या कायद्याचाच येथें मुख्यतः विचार केला असला तरी अश्लीलतेसंबंधीं कायदा काय असावा, त्याचा वापर केव्हां, कोणीं, आणि कसा करावा हा खरोखर मूलभूत प्रश्न नाहीं याची मला जाणीव आहे. कारण अश्लीलता हा एक सामाजिक प्रश्न आहे; आणि दारूबंदी, हुंडा इत्यादि प्रश्नांप्रमाणेंच हा प्रश्न केवळ कायद्यानें सुटणार नाहीं. किंबहुना कायद्याच्या मार्गानें हा प्रश्न सोडविण्यांत फार मोठा धोका आहे. कारण कायद्यानें हा प्रश्न सोडवावयाचा म्हटल्यास कायद्याला शेवटीं वाचकांवर खटले भरावे लागतील. म्हणून 'लेडी चॅटर्लीज लव्हर' किंवा 'युलिसिस'

कायद्याच्या भाषेंत अश्लील आहेत किंवा नाहींत हा प्रश्न गौण आहे. मानवी संस्कृतीच्या इतिहासांत अशा कादंबऱ्यांना कांहीं स्थान आहे किंवा नाहीं हा खरा प्रश्न आहे. आधुनिक जगांत मानवी कर्तृत्वावरची श्रद्धाच ढळावी अशी परिस्थिति निर्माण झाली आहे. अशा वेळीं प्रतिभावान् लेखकांच्या अशा कलाकृतीच मनुष्याच्या श्रेष्ठतेबद्दल दिलासा देतात. त्याच्या भविष्याबद्दल आशा निर्माण करतात. अश्लीलतेविरुद्ध कायद्यानें उघडलेल्या आघाडींत नेमक्या अशा कलाकृतीच नष्ट होऊन जातात, आणि मग जगावें असें कांहीं मनुष्याजवळ उरत नाहीं.

हा दृष्टिकोन जर बरोबर असेल तर फिर्यादी, आरोपी, वकील आणि न्यायाधीश यांच्या चौरंगी सामन्यांत निर्णय करावा इतका हा मामुली प्रश्न नाहीं हें मान्य करावें लागेल. अश्लीलता हा जर सामाजिक प्रश्न असेल, तर त्याचा विचार केवळ कायदा किंवा नीति यांच्या संदर्भातच करून चालणार नाहीं. व्यक्तिस्वातंत्र्याचाहि विचार करावा लागेल. कारण नीति केवळ नियंत्रणानें वाढत नाहीं; स्वातंत्र्यांत ती विकसित होत असते असा आजपर्यंतचा इतिहास आहे. अश्लीलतेच्या कायद्याचा निरनिराळ्या देशांतील अनुभवहि असाच आहे. या भूमिकेंतून हें लिखाण केलें आहे. मराठी वाचकांना माझा हा पहिला प्रयत्न पसंत पडेल अशी आशा मला वाटते आहे.

हें लिखाण ती. काकांच्या प्रोत्साहनाविना झालें नसतें. किंबहुना त्यांच्या प्रोत्साहनाशिवाय आयुष्यांतील कोणतेंहि यश मीं आजपर्यंत मिळविलेलें नाहीं. त्यांचे आभार मानावे असें त्यांचें–माझें नातें नाहीं. आणि त्यांचे आशीर्वाद मला सदैव आहेतच.

हें पुस्तक प्रसिद्ध करण्यासाठीं आलमगीरचे संपादक श्री. चं. वि. बावडेकर, व्हीनस प्रकाशनचे श्री. पाध्ये, आणि चित्रशाळेचे व्यवस्थापक यांनीं जे श्रम घेतले त्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार.

वि. न. गाडगीळ

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम 3८५५३ दि: ११।८।८५
९५४५ नों दि
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. 93८८०

## १ : अश्लीलता आणि कायदा

गेल्या साहित्यसंमेलनांत एक ठराव बराच गाजला. त्यानंतर कांहीं ठिकाणीं मासिकांवर अश्लीलतेबद्दल खटले भरण्यांत आले. याउलट इंग्लंड-मध्यें साहित्यिक व पत्रकार यांच्या संघटित प्रयत्नांमुळें एतद्विषयक कायद्यांत सुधारणा करण्यासाठीं एक विधेयक पार्लमेंटमध्यें आणण्यांत आलें व तें आतां पास होण्याच्या मार्गावर आहे. या विषयासंबंधीं परदेशांतील व हिंदु-स्थानांतील विचारांचें व कायद्यांचें समालोचन करण्याचा हा एक प्रयत्न आहे.

समाजांतील व्यक्तीव्यक्तींमधील संबंध आणि व्यक्ति व समाज यांमधील संबंध नियमित करण्यासाठीं समाजानें स्वीकारलेले नियम म्हणजे कायदा. समाजाच्या धारणेसाठीं आणि विकासासाठीं हे नियम आवश्यक असतात. समाजांतील एतद्विषयक प्रचलित तत्त्वज्ञान, विचारसरणी आणि नीतिमूल्यें कायद्यांत प्रतिबिंबित व्हावींत अशी अपेक्षा असते. परंतु समाजाच्या विचार-सरणींत सतत बदल होत असतो. आणि कायदा तर इतका झपाट्यानें बदलत नाहीं. यामुळें समाजांतील प्रचलित नीतिमूल्यें कायद्यांत प्रतिबिंबित होण्याऐवजीं अनेकदां गेल्या पिढ्या दोन पिढ्यांतील नीतिमूल्यें कायद्यांत गोठवलीं गेलेलीं दिसतात. आणि मग समाजांतील असहिष्णुता वाढली कीं जुन्याचे हट्टी अभिमानी प्रतिगामी कायद्याचा उपयोग क्रान्तिकारक व पुरोगामी विचार मारण्यासाठीं करूं लागतात. अश्लीलतेबद्दल हाच अनुभव

व इतिहास आहे. कायद्यांत महत्त्वाच्या शब्दांची व्याख्या करणें आवश्यक असतें; परंतु अश्लीलतेची व्याख्या इंग्रजी किंवा भारतीय कायद्यांत केलेली नाहीं. इंग्रजींत अश्लील Obscene आणि लैंगिक Pornography असा फरक केला जातो. परंतु इंग्रजींतहि अश्लील शब्दाची सर्वमान्य अशी व्याख्या नाहीं. ऑक्सफोर्ड किंवा वेबस्टरच्या शब्दकोशांत या शब्दांचें विपयासक्त, बीभत्स, अभद्र, किळसवाणे, ओंगळ, कामुक, लालसाप्रधान, अपवित्र व अशुद्ध असे अनेक अर्थ दिले आहेत. Obscene हा शब्द Caenum म्हणजे घाण या लॅटिन शब्दावरून आला, अशी व्युत्पत्ति आहे. आणि Pornography हा शब्द मात्र वेश्या या अर्थाच्या ग्रीक शब्दावरून आला असला पाहिजे.

अश्लीलतेची सर्वमान्य व्याख्या करणें अशक्य आहे. कारण डी. एच्. लॉरेन्सनें म्हटल्याप्रमाणें "जें एकाला कामुक अथवा लैंगिक वाङ्मय वाटतें, तेंच दुसऱ्याला अभिजात वाटणें अशक्य नाहीं!" कारण अश्लीलता मानण्यावर आहे, ही कल्पनाच मुळीं प्रामुख्यानें व्यक्तिनिष्ठ आहे. लहान विजार घालून हिंडणाऱ्या मुलाकडे पाहिलें कीं कुविचार निर्माण होणाऱ्या एका शिक्षक रोग्याची केस दाखवून हॅवलॉक एलिस त्याचा मित्र श्रोडर याला लिहिलेल्या एका पत्रांत विचारतो कीं, "या केसवरून सर्व विजारी अश्लील आहेत असें अनुमान काढायचें कीं काय?" म्हणून या शब्दाची सर्वसंमत अशी व्याख्या करणें अशक्य आहे.

आणि व्याख्या जरी केली तरी ती अपुरी पडेल. कारण अश्लीलतेबद्दलच्या समाजाच्या कल्पना बदलत असतात. ग्रीक व रोमन कालांतील कांहीं वाङ्मय आज अतिशय अश्लील वाटेल. परंतु त्या काळांत तें तसें मानलें जात नव्हतें. ग्रीसमध्यें स्पार्टा शहरांत डिओनिसिअसच्या यात्रेच्या वेळीं अश्लील विनोद व गाणीं ऐकविलीं जात. त्या काळीं नाटकें पाहण्यास स्त्रिया जात नसत. यामुळें कदाचित् अश्लील समजलें जावें असें बरेंच लिखाण श्रेष्ठ नाटककारांनींहि केलें आहे. उदाहरणार्थ, ॲरिस्टोफेनिसचें Lysistrata किंवा Assembly of Women हीं नाटकें. डिंडिम आणि सोटेर या नांवाचे दोन लेखक अशा लिखाणाबद्दल प्रसिद्ध होते; आज त्यांचें तें लिखाण उपलब्ध नाहीं. परंतु नंतर समाजांतील मतें बदलूं लागलीं. प्रोफेसर पॉपर

यांच्या मतें आधुनिक हुकूमशाही तत्त्वज्ञानाचें मूळ प्लेटोच्या लिखाणांत सांपडतें. या सिद्धान्ताला एक आधार म्हणजे प्लेटोचीं अश्लीलतेविषयींचीं मतें. ओडीसी या अभिजात काव्यांतील कांहीं भागांवर बंदी घालावी अशी त्यानें मागणी केली. दिराबद्दल झियसची आसक्ति वर्णन करणारे भाग गाळून टाकावे असा आग्रहहि धरण्यांत आला होता.

रोम साम्राज्यांत वेश्या, बाहेरख्यालीपणा व लैंगिक भ्रष्टाचार या विषयांवर प्लॉटस व टेरेन्स यांनीं नाटकें लिहिलीं. पुढें रोमनें ख्रिस्ती धर्माचा स्वीकार केल्यानंतर परिस्थिति बदलली. पेट्रोनियसच्या Satyricon वर बंदी त्यापूर्वींच घालण्यांत आली होती. Ars Amatoria लिहिल्याबद्दल ओव्हिडला हद्दपार करण्यांत आलें. म्युसियस व सावेलस यांचें वाङ्मय नष्ट करण्यांत आलें. रोमन लोकांचा एक आवडता छंद मात्र कायम राहिला. आणि तो म्हणजे सार्वजनिक ठिकाणीं उभारलेल्या पुतळ्यावर अश्लील शब्द खोदण्याचा !

जुन्या इंग्रजींत तर अश्लील लिखाण मुबलक आहे. श्लेष, छेकापन्हुति, कोट्या इत्यादि अलंकारांचा उपयोग करून दोन अर्थ होणारीं कोडीं रचलीं जात. अश्लील अर्थ घेतला तर लिंगाचें वर्णन व श्लील अर्थ घेतला तर कांदा, किल्ली किंवा तत्सम वस्तूंचें वर्णन होईल अशीं कित्येक कोडीं Exeter Book या पुस्तकांत आढळतात. आश्चर्याची गोष्ट म्हणजे या पुस्तकाचा विषय धार्मिक आहे, व एका धर्मोपदेशकानें तें रचलें होतें ! चॉसरच्या ‘ मिलर्स टेल ’ किंवा ‘ वाइफ ऑफ बाथ ’मधील वर्णनें तत्कालीन वाचकांना अश्लील वाटलीं नाहींत. आणि चॉसर तर राजकवि होता ! मध्ययुगांत ओव्हिड, जॉन एलयेरा, विल्यम ऑफ ओकहॅम यांच्या साहित्याचा अभ्यास धार्मिक पाठशाळांतहि होत असे. पुढें या व सॅव्होनरोलाच्या डिकॅमेरॉनसारख्या ग्रंथांवर बंदी घालण्यांत आली. परंतु कशासाठीं ? तर ते अश्लील होते म्हणून नव्हे, तर ख्रिस्ती धर्मविरोधी पाखंडी विचार त्यांच्यांत होते म्हणून ! कारण सेंट अल्फान्सोस लिगुरीच्या मतें कॅथॉलिक धर्माला ल्यूथरपेक्षांहि मोठा धोका डिकॅमेरॉनमुळें निर्माण झाला होता.

पंधराव्या शतकापासून इंग्लंडमध्यें नवीन नवीन छापखाने निघूं लागले, व पुस्तकप्रकाशनाचें प्रमाणहि वाढलें. अर्थातच यामुळें राजाच्या सत्तेला धोका निर्माण झाला, आणि सरकारी नियंत्रणें वाढूं लागलीं. सोळाव्या शतकांत

प्रथम सेन्सॉरशिपला सुरुवात झाली. १५३८ व १५५६ च्या कायद्यान्वयें परवान्याशिवाय पुस्तकें प्रसिद्ध करण्यास बंदी घालण्यांत आली. परंतु कुप्रसिद्ध स्टार चेंबर कोर्ट व धार्मिक न्यायालयें यांनीं फक्त राजकीय व धार्मिक लिखाणावरच बंधनें घातलीं. अश्लील वाङ्मयाकडे त्यांची क्वचित् नजर वळली. ॲव्हेल जेफ्रीस यांचें एका प्रेमी तरुणाची कहाणी किंवा ओव्हिडचें ख्रिस्तोफर मार्लोनें केलेलें भाषान्तर असे एक दोन अपवाद सोडले तर अश्लील म्हणून कोणत्याहि साहित्यावर बंदी घातल्याचीं उदाहरणें त्या काळांत सांपडत नाहींत. उलट विल्यम कोपलँड नांवाच्या एका लेखकाचें म्हाताऱ्या माणसानें तरुण स्त्रीशीं लग्न केल्यामुळें झालेल्या प्रकाराचें वर्णन करणाऱ्या एका पुस्तकाला परवाना देण्यांत आला होता! याचें मुख्य कारण एलिझाबेथच्या कारकीर्दीतील सहिष्णु सामाजिक जीवन. इंग्लंडचें वैभव वाढत होतें. आर्थिक दृष्ट्या त्या काळीं सुबत्ता होती. म्हणून हॅम्लेटमधील हॅम्लेट व ऑफेलिया यांचा नाटकाचा प्रवेश, किंवा एडवर्ड सेकंडमधील शेवटचा अंक, किंवा वेब्स्टरचीं नाटकें या समाजाला मानवलीं. तीं पचविण्याचा जिवंतपणा त्या समाजांत होता.

यानंतर मात्र कर्मठ प्युरिटन पंथाचा पगडा वाढूं लागला. जीवनांतील आनंद लुटणें अनैतिक व पापमय ठरूं लागलें. उपभोग म्हणजे भोग अशी व्याख्या झाली. रॉजर ॲशम, स्टीफने गॉसन या टीकाकारांनीं प्रत्येक वाङ्मयकृति अश्लील ठरविण्यास सुरुवात केली. थॉमस लॉजचें अर्नेस्ट एक्युजेस बेकायदा ठरविण्यांत आलें. लॅम्बार्ड नांवाच्या एका गृहस्थानें अशा वाङ्मयासंबंधीं एक विधेयक पार्लमेंटकडे पाठविलें. परंतु न्यायालयांनीं मात्र अश्लीलता हा फौजदारी गुन्हा होतो हें मानण्याचें नाकारलें. लॉर्ड कोकच्या इंग्लिश कायद्यावरच्या सुप्रसिद्ध ग्रंथांत अशा गुन्ह्याचा उल्लेखहि नाहीं! परंतु धार्मिक न्यायालयें अश्लीलतेबद्दल जागरूक होतीं. या न्यायालयांनीं विल्यम ट्रेन, बेंजामिन मॉर्गन इत्यादि लेखकांच्या पुस्तकांवर बंदी घातली. डॉ. डेनिसन नांवाच्या एका धर्मोपदेशकाला तर वेश्यांच्याबद्दल लिहिल्याबद्दल नोकरीवरून काढून टाकण्यांत आलें!

स्टुअर्ट काळांत वाङ्मयीन स्वातंत्र्य अबाधित राहिलें. परंतु क्रॉमवेलच्या कारकीर्दीत पुनश्च वातावरण बदललें. 'विमेन्स पार्लमेंट' या पुस्तकावर

बंदी घालण्यांत आली. डॉ. स्लेटर नांवाच्या धर्मोपदेशकाला न्यायालयांत खेचण्यांत आलें. नाटकगृहें बंद करण्यांत आलीं. कोणीहि नागरिकानें कोणत्याहि नाटकाबद्दल खबर द्यावी, तक्रार करावी, किंवा फिर्याद दाखल करावी असा कायदा झाला. समाजांतील रिकामटेकड्यांना एक उद्योग मिळाला. परंतु १६६० नंतर ही परिस्थिति पालटली. रेस्टोरेशनचा काळ होता तो. प्युरिटन कर्मठपणाविरुद्ध स्वाभाविक प्रतिक्रिया झाली. ड्रायडन, रोचेस्टर, सेड्ले, कॉंग्रीव्ह, वॅनब्रग, फर्कहार इत्यादि नाटककारांनीं समाजांतील वरच्या वर्गाचें जीवन खुसखुशीत व बहारदार रीतीनें चित्रित केलें. नीति-अनीतीच्या कल्पना बदलल्या. वॅनब्रगच्या 'रिलॅप्स' नांवाच्या नाटकांत तर समलिंगी संभोगाचा उल्लेख आहे. सेन्सॉरशिप नाममात्र राहिली. रंगेल शृंगाराचीं वर्णनें करणारीं स्वस्त 'चॅपबुक्स,' 'पेनिमेरिमेंडस्' अशा मालांतून प्रसिद्ध होणारीं पुस्तकें अतोनात लोकप्रिय झालीं. १६६२ चा लायसेन्सिंग ॲक्ट कायम होता. परंतु त्याचा वापर झाला नाहीं. १६८० च्या राज्यक्रान्तीनें नवीन राजवट आली. नवीन समाजरचना निर्माण झाली. कल्पना बदलल्या, आणि कायदाहि बदलला.

जेरेमी कोलीयरनें कॉंग्रीव्हच्या नाटकावर झोड उठविली. नवीन समाजरचनेंत मध्यम वर्गाचें महत्त्व वाढलें. आणि प्रथमच अश्लीलता गुन्हा आहे असे निर्णय देण्यास सुरवात केली. टॅटलर (१७०९), लंडन मॅगझिन (१७११), जंटलमन्स मॅगझिन (१७३१), लंडन मॅगझिन (१७३२), म्युझिअम (१७४६), मंथली रिव्ह्यू (१७४९), क्रिटिकल रिव्ह्यू (१७५६), लंडन रिव्ह्यू (१७७५),: ब्रिटिश क्रिटिक (१७९३), हीं व अशीं अनेक मासिकें १८ व्या शतकांत निघालीं. यांचा वाचकवर्ग मुख्यतः मध्यम वर्गातला होता. सुरवातीस त्या वर्गाची रसिकता शाबूत होती. फिल्डिंगचें टॉम जोन्स लंडन मॅगझिनला अश्लील वाटलें नाहीं. १७४८ सालीं स्मॉलेटची 'रोड्रिक रॅन्डम' ही कादंबरी प्रसिद्ध झाली. या कादंबरींत तर अंधारांत चुकीच्या पलंगावर झोपल्यामुळें निर्माण होणाऱ्या घोटाळ्याचें वर्णन आहे. आश्चर्य म्हणजे अशीं वर्णनें असूनहि ही कादंबरी माजघरांत स्त्रियांच्या समोर मोठ्यानें वाचण्यांत कांहींच गैर मानलें जात नव्हतें, असें फॅनी बोसकावेन किंवा मिसेस डेलानी यांच्या तत्कालीन पत्र-

व्यवहारांतून दिसतें! स्टर्नचें 'टीस्टम शॅन्डी'मधील कांहीं भाग आज अश्लील वाटण्याचा संभव आहे. परंतु त्या काळीं तरी त्याविरुद्ध ओरड झालेली दिसत नाहीं. सामाजिक नीति सुधारावी या हेतूनें लिखाण करणाऱ्या खुद्द रिचर्डसनच्या कादंबरींतसुद्धां कॅरीसा व लव्हलेस यांच्या लैंगिक जीवनाचीं बारीक सारीक वर्णनें आढळतात!

## नवा कायदा

अठराव्या शतकाच्या उत्तरार्धांत मात्र साहित्याविषयींची ही समाजाची भूमिका बदलली. सामाजिक शिष्टाचार सुधारण्याच्या उद्देशानें स्थापन झालेल्या सोसायटी फॉर रिफॉर्मेशन ऑफ मॅनर्स या संस्थेनें या बाबतींत पुढाकार घेतला. १७२५ पर्यंत या संस्थेनें सरकारवर दडपण आणून एकूण ९१,८९९ लोकांना अटक करावयास लावली. जॉन वेस्लेच्या आशीर्वादानें या संस्थेचा जीर्णोद्धार करण्यांत आला. १७०२ मध्यें जॉन्सनच्या वॉल्पोन व क्राउनच्या सर कोर्टले नाइस या नाटकांत काम केल्याबद्दल कांहीं नटांवर खटला भरण्यांत आला होता. अश्लीलतेबद्दल असेच खटले कॉंग्रीव्हच्या 'लव्ह फॉर लव्ह', 'ॲनारामिस्ट' व वॅनब्रगच्या 'प्रव्होक्ड वाइफ' या नाटकांबद्दल भरण्यांत आले. परंतु न्यायालयानें सर्वांना निर्दोषी ठरवून सोडून दिलें. डिफो व फिल्डिंग यांनीं मात्र या सर्व नाटकांवर अश्लील म्हणून प्रखर टीका केली. या सर्व गोष्टींचा सरकारवर परिणाम होऊन १७३७ मध्यें नवीन लायसेन्सिंग ॲक्ट पास करण्यांत आला. या कायद्यान्वयें कोणत्याहि नाटकाचा प्रयोग करण्यापूर्वी सात दिवस अगोदर परवानगीसाठीं लॉर्ड चेंबर्लेन या अधिकाऱ्याकडे अर्ज करावा लागे.

* * *

## २ : अश्लीलतेची आजची प्रमाणभूत कसोटी

कायदा बदलला, परंतु समाज फार झपाट्यानें बदलत होता. साक्षरता सारखी वाढत होती. अशिक्षित साक्षरांचा एक नवीन वर्ग तयार झाला होता. या वर्गासाठीं वाङ्मयीन गुणशून्य असलेलीं परंतु उत्तान, भडक, लैंगिक व कामुक पुस्तकें फार मोठ्या प्रमाणांत प्रसिद्ध होऊं लागलीं. आतां मात्र न्यायालयें जागीं झालीं. समाजांतील या प्रवृत्तींकडे डोळेझांक करणें न्यायालयांना अशक्यच होतें.

१७०८ मध्यें फिफ्टीन प्लेगस् ऑफ मेडप्रेडड या नांवाचें पुस्तक प्रसिद्ध केल्याबद्दल रीड नांवाच्या गृहस्थावर खटला भरण्यांत आला होता. रीडला निर्दोषी म्हणून सोडून देतांना न्या. मू. पॉवेल यांनीं असे उद्गार काढले कीं, "हें पुस्तक अश्लील आहे, परंतु अश्लीलता हा गुन्हा आहे असें ठरविणारा कायदा पार्लमेंटनें पास केलेला नाहीं." हा युक्तिवाद कर्लच्या खटल्यांत (१७२७) न्या. मू. फॉर्टेस्क्यू यांनीं अमान्य केला. या खटल्यांतील निर्णय ऐतिहासिक ठरला. कारण या निकालपत्रांत त्यांनीं असा निर्णय दिला कीं, पार्लमेंटनें कायदा केलेला नसला तरी सर्वसामान्य कायद्याप्रमाणें अश्लीलता हा गुन्हा ठरतो. आणि आजतागायत हा निर्णय इंग्लंडमध्यें अधिकृत म्हणून स्वीकारला जातो. 'नन इन हर स्मॉक' हें पुस्तक प्रसिद्ध केल्याबद्दल हा खटला भरण्यांत आला होता. या खटल्याव्यतिरिक्त या काळांत महत्त्वाचे खटले भरलेले दिसत नाहींत. मॅथ्यु लुईसवर 'दि मॉंक' या पुस्तकाबद्दल

खटला भरला होता. परंतु तान्त्रिक मुद्द्यावर तो काढून टाकण्यांत आला. विल्कीसवर १७६३ मध्यें 'एसे ऑन वीमेन' या कवितेबद्दल खटला भरण्यांत आला होता. परंतु ती कविता अश्लील होती किंवा नाहीं याबद्दल निर्णय मात्र न्यायालयानें दिला नाहीं, कारण हा खटला मुख्यतः राजकीय हेतूनें भरण्यांत आला होता. लॉर्डस् सभागृहांत लॉर्ड सँडविच यांनीं ह्या कवितेंतील निवडक उतारे वाचून दाखविले. लॉर्ड लिटलटन यांनीं हें वाचन बंद करावें अशी मागणी केली. परंतु "वाचा, वाचा" असा इतर सभासदांनीं एकच गिल्ला केल्यामुळें संपूर्ण वाचन करण्यांत आलें!

नव्या कायद्यांमुळें किंवा न्यायालयांच्या निर्णयांमुळें अशा लिखाणांत मात्र खंड पडला नाहीं. 'मेमॉयर्स ऑफ ए वुमन ऑफ प्लेझर' हें अतिशय कामुक पुस्तक जॉन क्लिलँड यानें १७४८ सालीं प्रसिद्ध केलें. तें इतकें लोकप्रिय झालें कीं, त्याला २० हजार पौंड नफा मिळाला! त्याला न्यायालयांत खेचण्यांत आलें; परंतु असें लिखाण पुन्हा करणार नाहीं या अटीवर त्याला सोडून देण्यांत आलें, आणि वर १०० पौंड पेन्शन देण्यांत आलें! १७८० मध्यें हॅरिसननें 'लिस्ट ऑफ कॉव्हेंट गार्डन लेडीज' या नांवाचें एक पुस्तक प्रसिद्ध केलें. या पुस्तकांत निरनिराळ्या वेश्यांच्या कामुक वर्णनाशिवाय कांहींहि नव्हतें. १७९५ मध्यें रेंजर्स नांवाचें एक मासिक प्रसिद्ध होऊं लागलें. या मासिकांत तर वेश्यांची नांववार यादीच दिली जात असे!

एकोणिसाव्या शतकांत ही परिस्थिति पालटली. व्हिक्टोरियाच्या कारकीर्दीत सामाजिक व्यवहारांत सोवळेपणा वाढला. धार्मिकता, शुचिता व पावित्र्य यांचें स्तोम अवास्तव वाढविण्यांत आलें. अश्लीलतेबद्दल आचरट कल्पना मानण्यांत येऊं लागल्या. एका लेखकानें विनोदानें म्हटलें आहे कीं, या कालांतील स्त्रिया कपड्याप्रमाणें स्वतःचें मन बदलतांनासुद्धां दारें लावून घेत. असें वातावरण निर्माण होण्याचीं कारणें अनेक होतीं. इव्हँनजेलिस्ट पंथाच्या कार्यामुळें धार्मिक गोष्टींना अतोनात महत्त्व आलें. बेन्थॅमच्या उपयुक्ततावादामुळें प्रत्येक गोष्टीचा म्हणजे वाङ्मयाचासुद्धां संकोचित दृष्टिकोनांतून विचार होऊं लागला. औद्योगिक क्रान्तीनंतर निर्माण झालेल्या नवीन मध्यम वर्गाचीं नीतिमूल्यें सर्व समाजानें मानलीं पाहिजेत असा आग्रह होऊं लागला. या वर्गानें सामाजिक जीवनांतील कुटुंबव्यवस्थेचें महत्त्व वाढविलें,

आणि या व्यवस्थेला पोषक असें साहित्यच उत्कृष्ट साहित्य असें मानलें. जें साहित्य बायकामुलांच्या समोर वाचून दाखवितां येईल तेंच योग्य साहित्य, बाकीचें सर्व अश्लील- ही कसोटी ठरली. ( कै. तात्यासाहेब केळकरांनीं हीच कसोटी मांडली होती. ) या मध्यम वर्गांतील स्त्रियांना एक विशिष्ट प्रकारचें साहित्य आवडत असे. निदान तसा देखावा तरी निर्माण करण्यांत येई ! हें साहित्य म्हणजे बाळबोध समजलें जाणारें भरपूर रडारडीनें भरलेलें भावनात्मक साहित्य !

या वातावरणांत वाङ्मयांतील अश्लीलतेबद्दल ओरड झाली नसती तरच आश्चर्य ! विल्यम रिचर्डसन, जॉन स्टाइल्स आणि खुद्द कोलरिज इत्यादि टीकाकारांनीं शेक्सपियरला अश्लील ठरवून टाकलें ! शेक्सपियरच्या 'सुधारून कमी केलेल्या' आवृत्त्या काढण्यास बॉल्डरनें सुरुवात केली. ऑथेल्लोमधून बिआंकाचें पात्र गाळून टाकण्यांत आलें ! सिम्बलेलिनमधील "With everything that pretty is, My lady sweet arise, Arise, Arise" या ओळी बदलून "With everything that pretty is, For shame thou sluggard rise" अशा ओळी घालण्यांत आल्या ! !

व्हाइस सोसायटी नांवाच्या एका 'संस्कृतिसंरक्षक मंडळा'नें तर या काळांत कहर केला. ही सोसायटी म्हणजे नसत्या उठाठेवी करणाऱ्या लोकांचें मंडळ बनलें होतें. तिच्या शाखा इंग्लंडभर पसरल्या होत्या. या सोसायटीच्या प्रयत्नांमुळें पेनचें 'एज ऑफ रिझन' प्रसिद्ध केल्याबद्दल रिचर्ड कार्लाईलवर खटला भरण्यांत आला, आणि त्याला १००० पौंड दंड आणि २ वर्षांची शिक्षा झाली ! याशिवाय एकट्या लंडनमध्यें पंचवीस प्रकाशकांवर खटले भरण्यांत आले. अश्लील फ्रेंच कादंबऱ्या प्रसिद्ध केल्याबद्दल बेनबोवर खटला भरण्यांत आला, परंतु यापूर्वींच इंग्रजीमध्यें त्याचें भाषान्तर झालें आहे या मुद्द्यावर तो सुटला. परंतु इतकें करूनहि लैंगिक व कामुक लिखाण थांबलें नाहीं. तें भूमिगत झालें. एका झडतींतच १२०० चित्रांचे ठसे सांपडले ! आणि हा व्यापार इंग्लंडमधील इटालियन लोकांच्या हातीं गेला ! ऑक्सफर्डच्या विद्यार्थ्यांनीं तर या सोसायटीची टर उडविण्यासाठीं एक खोटीच शाखा स्थापन केली, आणि न भरलेल्या सभांचे अहवाल प्रसिद्ध केले ! आणि तपकिरीच्या डब्यांतून अश्लील साहित्य व चित्रें या विद्यार्थ्यांत

प्रसृत होऊं लागलीं ! सोसायटीनें सरकारवर अवलंबून न राहतां स्वतःच कांहीं पुस्तकें जाळून टाकलीं. परंतु सोसायटीच्या सभासदांचाच खुद्द एकमेकांवर विश्वास नव्हता. म्हणून जप्त केलेलीं पुस्तकें एका पेटींत ठेवलीं जात, आणि त्याच्या तीन किल्ल्या तीन निरनिराळ्या सभासदांकडे ठेवल्या जात. कोणत्याहि एका किल्लीनें न उघडलें जाईल असेंच कुलूप लावण्यांत येई !

कामुक आणि लैंगिक लिखाण प्रसिद्ध करणारीं मासिकेंहि सोसायटीच्या प्रयत्नांमुळें बंद पडलीं नाहींत. पर्ल, एक्स्विझिट, इंग्लिश वुइमेन्स डोमेस्टिक मॅगेझिन अशीं सोज्वळ नांवें धारण करून अशीं मासिकें प्रसिद्ध होत होतीं. एडवर्ड सेलॉनचें न्यू एपिक्यूरियन आणि रोमान्स ऑफ लस्ट अशीं वैषयिक पुस्तकेंहि प्रसिद्ध होत होतीं. अर्थातच हे प्रकार सामाजिक नीतिमत्तेच्या स्वयंनियुक्त रखवालदारांना खपणारे होते. त्यांनीं आपली नजर बऱ्या साहित्यिकांकडे वळविली. या कालांत वाचनालयांची संख्या वाढत होती. मुडी आणि डब्ल्यू. एच्. स्मिथ ग्रंथालयांच्या मालकांनीं जॉर्ज मूरच्या कादंबऱ्या आपल्या वाचनालयांतून काढून टाकल्या. नग्न स्त्रीचें चित्र काढणारा चित्रकार हा खरा कलावंतच नव्हे असें रस्किन शिकवूं लागला. कीट्सची एंडीमिऑन ही कविता ब्लॅकवूड, ब्रिटिश क्रिटिक इत्यादि मासिकांनीं अश्लील ठरवून टाकली. बायरनची 'डॉन वॉन' प्रसिद्ध झाल्यावर तर अशी ओरड झाली कीं विचारूं नका! बायरनचें 'व्हिजन ऑफ जजमेंट' प्रसिद्ध केल्याबद्दल १८८२ मध्यें जॉन हंटरवर खटला भरण्यांत आला. शेलेचें सेन्सी हें नाटक रंगभूमीवर आणण्यास कोणीहि तयार होईना; आणि त्याचा पहिला जाहीर प्रयोग सुमारें १०० वर्षांनंतर १९२२ सालीं झाला ! शेलेचें 'क्विन मॅब' प्रसिद्ध केल्याबद्दल क्लार्क या प्रकाशकाला चार महिन्यांची शिक्षा झाली ! ब्रॉन्टीच्या जेन आयरवरसुद्धां वेस्टमिन्स्टर इत्यादि मासिकांनीं अश्लीलतेचा शिक्का मारला ! जेन आयरची ही कथा, तर बालझाकच्या कादंबऱ्यांची काय वाट लावण्यांत आली असेल ? पॅरिसमधील बालझाकची गटारगंगा इंग्लंडमध्यें आली,—असाच अभिप्राय बहुतेक मासिकांनीं दिला. मिसेस गॅस्केलनें रूथ ही कादंबरी प्रसिद्ध केली मात्र, आणि टीकेचा जो भडिमार झाला कीं तिला अक्षरशः रडायला लावलें ! मग अशा टीकेंतून जॉर्ज मेरीडीथ, चार्लस रीड, टेनिसन, स्विनबर्ग हे लेखक सुटणेंच शक्य

नव्हतें. मेकॉलेनें म्हटल्याप्रमाणें इंग्लिश लोकांना नेहमींच मधून मधून नैतिकतेचा झटका येतो, त्यांपैकींच हा एक झटका होता ! हा झटका किती जोरदार होता याची कल्पना मोर्लेच्या लिखाणावरून येते. जॉन मोर्ले हा या काळांतील अतिशय उदार, सहिष्णु आणि सुसंस्कृत विचारवंत समजला जातो. परंतु तोदेखील या लाटेंत वाहवला, आणि अश्लील लेखक ठरविण्या-साठीं त्यानें जी भाषा वापरली ती अतिशय अनुदार, असभ्य आणि असंस्कृत होती. मोर्लेसारख्यांची ही गत, मग इतरांचें काय विचारतां ? मादाम बोवरीसारख्या फ्रेंच कादंबऱ्या इंग्लंडमध्यें प्रसिद्ध झाल्यावर तर सर्वच विवेक सुटला, आणि १८५१ मध्यें लंडनमध्यें जेव्हां औद्योगिक प्रदर्शन भरण्याचें ठरलें त्या वेळीं सिब्रॉथर्नसारख्या टीकाकारांनीं लिहिण्यास सुरुवात केली कीं,—या प्रदर्शनासाठीं परदेशी— विशेषतः फ्रेंच लोक येतील तेव्हां आपल्या बायका—मुलींना सांभाळा ! !

या वावटळींत कायदा स्वस्थ राहणें अशक्य होतें. १८४३ मध्यें थिएटर ॲक्ट पास करण्यांत आला. हा कायदा इंग्लंडमध्यें अद्याप अंमलांत आहे. या कायद्यान्वयें नाटकगृहें उघडण्यास आणि नाटकाचे प्रयोग करण्यास लॉर्ड चेंबरलेन या अधिकाऱ्याची परवानगी घ्यावी लागते. आणि त्याला एखादें नाटक अयोग्य वाटलें तर तें बंद करण्याचा अधिकार देण्यांत आला ! १८५३ मध्यें कस्टम ॲक्टमध्यें बदल करून परदेशांतून येणारें कोणतेंहि साहित्य अश्लील ठरवून जप्त करण्याचा अधिकार कस्टम अधिकाऱ्यांना देण्यांत आला. १८५७ मध्यें लॉर्ड कॅम्बेल यांनीं एतद्विषयक एक विधेयक मांडलें, आणि तो कायदा त्याच्या जनकाच्या नांवानें अजूनहि लॉर्ड कॅम्बेल ॲक्ट म्हणून ओळखला जातो. हें विधेयक मांडतांना त्यानें तत्कालीन लोकप्रिय विचारसरणीचाच पुरस्कार केला कीं,—अश्लील, कामुक आणि लैंगिक लिखाण बेसुमार वाढतें आहे, आणि सामाजिक नीति त्यामुळें बिघडली आहे. व्हाइस सोसायटीनें ५५ वर्षांत १५९ खटले केले, आणि यांपैकीं फक्त पांच खटल्यां-तच आरोपी निर्दोषी ठरले. बाकीच्यांना सरासरी आठ महिन्यांची शिक्षा देण्यांत आली. १८४५ च्या एका खटल्यांत एका दुकानदाराकडे १२३४६ चित्रांचे ठसे, ३९३ पुस्तकें, ३५१ तांब्याच्या प्लेटस् व १८८ लिथोग्राफ्स् सांपडले ! सोसायटीच्या प्रयत्नांमुळें एकूण ५७ दुकानांपैकीं ३७ दुकानें बंद

झाली. ही सर्व आंकडेवारी कॅम्बेलनें आपलें विधेयक मांडतांना सादर केली, आणि अशा कायद्याची किती आवश्यकता आहे हें सिद्ध करण्याचा प्रयत्न केला. लिंडर्स्ट, ब्रॉम, रोबक, मिल्ने इत्यादि सभासदांनीं विधेयकाला विरोध केला. परंतु अखेर तें पास झालें. कॅम्बेलचा मात्र विवेक इतका ढळला होता कीं, विधेयक कॉमन्स सभागृहापुढें मांडलें जात असतांना तो स्वतः गॅलरींत येऊन बसला! सभासदांनीं त्याविरुद्ध आरडाओरड केली; आणि समितीनें कॅम्बेलचें हें वर्तन घटनाबाह्य आहे असा निकाल देऊन त्याचा निषेध केला. विरोधकांची विचारसरणी रोबकनें एका वाक्यांत सांगितली—'पार्लमेंटच्या कायद्यानें नागरिकांची रुचि बदलणार नाहीं.' या कायद्यान्वयें अशा लिखाणाबद्दल कोणत्याहि दुकानाची संशयावरून झडती घेण्याचा अधिकार पोलिसांना देण्यांत आला, आणि मॅजिस्ट्रेटनें तसा हुकूम दिला तर असें लिखाण संपूर्ण नष्ट करण्याचा अधिकारहि त्यांना मिळाला. परंतु कॉमन्सच्या दडपणामुळें अपील करण्याचा हक्क आरोपीला देण्यांत आला, आणि प्रत्यक्ष विक्री होईपर्यंत हा अधिकार वापरतां येणार नाहीं, अशी तरतूदहि करण्यांत आली.

दहा वर्षांनंतर या कायद्याचा अन्वयार्थ न्यायालयानें लावला, आणि हा निर्णय कायद्याच्या इतिहासांत युगप्रवर्तक ठरला. हेन्री स्कॉट नांवाच्या पुस्तक-विक्रेत्यावर या कायद्याखालीं १६८८ सालीं खटला भरण्यांत आला. 'कन्फेशन अन्मास्क्ड्' या नांवाचें चोपडें विकलें हा त्याच्यावरचा आरोप. कॅथॉलिक धर्मांत प्रत्येक कॅथॉलिकानें आपण केलेल्या पापांचा कबुलीजबाब गुप्तपणें धर्मोपदेशकाजवळ जाऊन करावा असा आदेश आहे. या आदेशाप्रमाणें काय काय कबुलीजबाब दिले जातात व त्यांचा दुरुपयोग कसा होतो इत्यादि वर्णन करणारें हें चोपडें कॅथॉलिकांना शत्रु मानणाऱ्या एका प्रॉटेस्टंट संघटनेनें प्रसिद्ध केलें होतें. यांतील कांहीं भाग अश्लील आहे असा आरोप होता. या चोपड्याच्या २५२ प्रती जप्त करण्यांत आल्या, व मॅजिस्ट्रेटनें त्या अश्लील ठरवून त्या नष्ट कराव्या असा हुकूम दिला. त्याविरुद्ध स्कॉटनें अपील केलें. अपिलांत निकाल कायम करण्यांत आला. निकालपत्राचे सरन्यायाधीश लॉर्ड कोकबर्न यांनीं अश्लीलतेची कसोटी ठरविली, "ज्यांच्या हातांत असें लिखाण पडण्याचा संभव आहे, आणि ज्यांचीं मनें या बाबतींत

संस्कारक्षम आहेत अशा नागरिकांच्या हातांत असें लिखाण पडलें तर ते आचारभ्रष्ट आणि नीतिभ्रष्ट होतील का ? ”

The test of obscenity is whether the tendency of the matter charged as obscenity is to deprave and corrupt those whose minds are open to such unmoral influences and into whose hands a publication of this sort may fall.

ही कसोटी आणि व्याख्या आजतागायत अमेरिका, आयर्लंड, कॅनडा, ऑस्ट्रेलिया व हिंदुस्थान या देशांत अधिकृत मानली जाते. ‘ हिकलीन ’ कसोटी म्हणून ती जगन्मान्य झाली. परंतु विसाव्या शतकांत ही कसोटी आणि व्याख्या अपुरी ठरली आहे. यासंबंधीचा विचार पुढील प्रकरणांत करण्यांत आला आहे.

* * *

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत.
अनुक्रम 35422 दि: 19व६
9444 नों दि: ६/५/६५

## ३ : गेल्या शतकांत गाजलेले कांहीं खटले !

१८६८ सालच्या हिकलीन खटल्यांत सरन्यायाधीश कोकबर्न यांनीं केलेली अश्लीलतेची कसोटी आणि व्याख्या त्यापुढील प्रत्येक खटल्यांत उद्धृत करण्यांत येऊं लागली. १८७० सालीं पोस्ट ऑफिस ॲक्टमध्यें बदल करून अश्लील वाङ्मय पोस्टानें पाठविण्यास बंदी करण्यांत आली, परंतु पाकिटें किंवा पार्सलें उघडण्याचा अधिकार मात्र पोस्ट खात्याला मिळाला नाहीं.

१८७७ मध्यें चार्लस् ब्रॅडलॉ आणि ॲनी बेझंट यांच्यावरचा एक खटला अतिशय गाजला. संततिनियमनाचा पुरस्कार करणारें चार्लस नोलटसचें ‘फ्रुट्स ऑफ फिलॉसफी’ नांवाचें पुस्तक त्या दोघांनीं प्रसिद्ध केलें होतें. ॲनी बेझंटच्या विरुद्धचा खटला काढून घेण्याची तयारी सरकारनें दाखविली होती, परंतु तिनें ती नाकारली ! संततिनियमनाचा पुरस्कार करणें अश्लील आहे असा आरोप करण्यांत आला होता. दोघांहि आरोपींनीं वकील न देतां स्वतःचा बचाव केला. ॲनी बेझंटनें तर तासनतास बचावाचें भाषण केलें, आणि ज्यूरीला सांगितलें कीं, “तुम्हीं मला जरी दोषी ठरविलें तरी पुढील पिढ्या मला निर्दोषी ठरवितील !” खटल्याच्या तिसऱ्या दिवशीं आरोपीचें लोकांनीं टाळ्या वाजवून स्वागत केलें. कोकबर्ननें ज्यूरींना खटल्यासंबंधीं आदेश देतांना आरोपींच्या बाजूनें निर्णय द्यावा असें सूचित केलें. हा खटला भरण्याचा बदसल्ला कोणीं दिला हें मला कळत नाहीं, असेहि उद्गार न्यायाधीशांनीं काढले. परंतु ज्यूरींनीं मात्र विसंगत आणि विचित्र

निर्णय दिला कीं, "सार्वजनिक नीतिमत्ता बिघडेल असेंच हें पुस्तक आहे; परंतु तें सद्हेतूनें प्रसिद्ध केलें असल्यामुळें आरोपी निर्दोषी आहेत असें आम्हांला वाटतें !" कायद्याच्या दृष्टीनें याचा अर्थ आरोपी दोषी आहेत असा होतो, असा निर्णय न्यायाधीशांना नाखुषीनें द्यावा लागला. त्यावर अपील करण्याची परवानगी आरोपींनीं मागितली. कांहींहि शिक्षा न देतां न्यायाधीश आरोपींना सोडून देणार होते, परंतु ज्यूरींच्या निर्णयानंतर ॲनी बेझंटनें एका सभेंत भाषण केलें आणि त्या भाषणांत सांगितलें कीं, "अशींच पुस्तकें मी प्रसिद्ध करीत राहणार. आणि अशीं पुस्तकें अश्लील ठरत नाहींत असें खुद्द सरन्यायाधीशांचेंच मत आहे." या भाषणामुळें सरन्यायाधीशांनीं त्यांना ६ महिने कारावास व २०० पौंड दंडाची शिक्षा दिली. या हुकुमावर दोघांनीं अपील केलें, आणि अपिलांत दोघांची शिक्षा रद्द झाली. आरोपींच्या बचावासाठीं लोकांनीं १००० पौंडांचा निधि जमविला होता. आणि येवढा खटाटोप करून केलेल्या खटल्याचा परिणाम मात्र एवढाच झाला कीं, त्या पुस्तकाचा खप १२ लाखांनीं वाढला !!

## साहित्यिकांचें बंड

एकोणिसाव्या शतकाच्या शेवटच्या खंडांत हेनी जेम्स, थॉमस हार्डी, जॉर्ज मूर, ऑस्कर वाइल्ड इत्यादि लेखकांनीं साहित्यविषयक प्रचलित नीतिमूल्यां-विरुद्ध बंडच उभारलें. १८८३ मध्यें जॉर्ज मूरची 'मॉडर्न लव्हर' ही कादंबरी प्रसिद्ध झाली. एका चित्रकाराचें लैंगिक जीवन या कादंबरींत रंगविलें आहे. १८८४ मध्यें त्यानें 'ममर्स वाइफ' प्रसिद्ध केली. या दोन्ही कादंबऱ्या मुडी व स्मिथ या वाचनालयांनीं आपल्या शाखांसाठीं विकत घेण्याचें नाकारलें. ह्या मुस्कटदाबीला उत्तर म्हणून मूरनें त्यांची स्वस्त आवृत्ति काढली, आणि 'लिटरेचर ॲट नर्स' नांवाचें एक चोपडें लिहून या वाचनालयांवर हल्ला चढविला. हार्डीची 'टेस' कांहीं मासिकांनीं स्वीकारण्याचें नाकारलें. हार्डीनें आक्षेपार्ह भाग गाळून ती 'ग्राफिक' मासिकांत क्रमशः प्रसिद्ध केली, परंतु पुस्तकरूपानें प्रसिद्ध करतांना मात्र ते भाग घालून प्रसिद्ध केली ! त्यानें 'ज्यूड' प्रसिद्ध केल्यावर तर टीकाकारांनीं त्याला सळो कीं पळो करून सोडलें. वेकफील्डच्या बिशपनें तिची जाहीर

होळी केली, परंतु एडमंड गॉस, हॅवलॉक एलिस इत्यादि विचारवंत त्याच्या मदतीस धांवून आले.

## प्रकाशकांना तुरुंगवास

नाटकांच्या बाबतींत हाच प्रकार. १८९१ मध्यें इब्सेनच्या 'घोस्ट'चा पहिला प्रयोग झाला. 'गलिच्छ', 'ओंगळ', 'घाणेरडें', 'इब्सेनची कचऱ्याची पेटी' अशा शब्दांत या नाटकाची स्टेज, ट्रुथ, इरा, क्विन इत्यादि मासिकांनीं संभावना केली. बर्नार्ड शॉच्या 'मिसेस वॉरन्स प्रोफेशन'-ला तर १९०२ पर्यंत परवानगीच नाकारण्यांत आली. वाइल्डचें 'सालोमी' आणि ग्रॅनव्हिलचें 'वेस्ट' या नाटकांच्या प्रयोगाला तर परवानगी अनेक वर्षें नाकारली होती.

या साहित्यिकांची मुस्कटदाबी करण्यांत आली हें खरें, परंतु निदान त्यांना तुरुंगांत तरी जायला लागलें नाहीं. स्टीडला मात्र 'पॉल मॉल गॅझेट'-मध्यें वेश्याविषयक लेख लिहिल्याबद्दल तुरुंगांत जावें लागलें. झोलाचें वाङ्मय इंग्रजींत प्रसिद्ध केल्याबद्दल विझेटेली या प्रकाशकालाहि तुरुंगांत जावें लागलें. आश्चर्य म्हणजे या वावटळींत एके काळीं बळी पडलेल्या स्विनबर्न आणि टेनिसन यांनींदेखील झोलाला अश्लील ठरविलें! या खटल्यांत एकूण २१ आक्षेपार्ह भाग वाचून दाखविण्यांत आले. असें वाङ्मय पुन्हा प्रसिद्ध करणार नाहीं असें अभिवचन घेऊन विझेटेलीला सोडून देण्यांत आलें. त्यानंतर शेक्सपियरपासून स्विनबर्नपर्यंतच्या सर्व अभिजात इंग्रजी वाङ्मयांतील अश्लील वाटणाऱ्या उताऱ्यांचें एक पुस्तक त्यानें प्रसिद्ध केलें, आणि तें ॲटर्नी जनरल्ला पाठवून दिलें. त्यासोबतच्या पत्रांत त्यानें लिहिलें कीं, असे संदर्भविरहित उतारे ज्यूरींपुढें वाचून दाखविले तर सर्व अभिजात इंग्रजी वाङ्मय अश्लील ठरवून त्यावर बंदी घालावी लागेल! खुद्द बायबलमधील अश्लील उताऱ्यांचें असेंच एक पुस्तक ॲनी बेझंटनेंसुद्धां प्रसिद्ध केलें होतें. १८८९ सालीं विझेटेलीवर फ्रेंच कादंबऱ्यांचीं भाषान्तरें प्रसिद्ध करण्याबद्दल पुन्हा खटला भरण्यांत आला. या खेपेस मात्र त्याला तीन महिन्यांची शिक्षा झाली. त्या वेळीं त्याचें वय ६९ वर्षांचें होतें. तुरुंगवासानें त्याचें मरण लवकर ओढवलें, आणि पर-

देशांतील उत्कृष्ट साहित्य इंग्रजींत आणून इंग्रजी साहित्यावर ज्यानें अनंत उपकार केले,–असा हा धाडसी पुरोगामी प्रकाशक १८९४ सालीं मृत्यु पावला ! लोकमत किती चंचल आहे पहा ! विझेटेलीवरच्या पहिल्या खटल्यापूर्वी तीनच आठवडे लिजन ऑफ ऑनर देऊन फ्रेंच सरकारनें झोलाचा गौरव केला होता. आणि विझेटेलीच्या मृत्यूनंतर दोन वर्षांनीं तर खुद्द लंडनमध्येंच झोलाचा सत्कार करण्यांत आला ! !

### हॅवलॉक एलिसचा आक्षेपार्ह ग्रंथ

यानंतर दुसरा गाजलेला खटला म्हणजे हॅवलॉक एलिसचा 'सेक्शुअल इनव्हर्शन' हा ग्रंथ प्रसिद्ध केल्याबद्दल प्रकाशक बेडब्रो यावर भरलेला. खटला लढविण्यासाठीं एव्हरीसारखा मोठा वकील देण्यांत आला होता. प्रकाशकाच्या बाजूनें साक्ष देण्यासाठीं अनेक शास्त्रज्ञांना आणि तज्ज्ञांना बोलावण्यांत आलें होतें. परंतु ऑस्कर वाइल्डवरच्या खटल्याची आठवण अजून ताजी होती. अशा परिस्थितींत ज्यूरींचा निर्णय विरुद्ध जाईल अशी भीति वाटून बेडब्रोनें गुन्हा कबूल केला, आणि बॉंड घेऊन त्याला सोडण्यांत आलें. हॅवलॉक एलिसची सर्व तयारी वायां गेली ! अश्लील ठरलेल्या या ग्रंथाचें आज जगांतील सर्व प्रमुख भाषांत भाषान्तर होऊन त्याच्या अनेक आवृत्त्या निघाल्या आहेत !

### विसाव्या शतकांत

कायद्याचा वापर करून सामाजिक नीतिमत्ता आणि अभिरुचि वाढविण्याचा हा प्रयत्न विसाव्या शतकांत चालू राहिला. व्हाइस सोसायटी बंद पडली, पण तिची जागा नॅशनल व्हिजिलन्स असोसिएशन, पब्लिक मॉरॅलिटी कौन्सिल– अशा नव्यानें स्थापन झालेल्या संस्थांनीं घेतली. १९०२ सालीं शिक्षकांची एक परिषद् घेऊन अश्लील लिखाणावर बंदी घालावी अशी मागणी करण्यांत आली. गृहमंत्र्यांना भेटून एका शिष्टमंडळानें लॉर्ड कॅम्बेलचा कायदा बदलून अधिक कडक करावा अशी विनंती केली. १९०८ सालीं लंडनमध्यें कॅक्स्टन हॉलमध्यें सभा घेऊन एक अश्लीलताविरोधी आघाडी उघडण्यांत आली. या आघाडीच्या एका समितीनें एक विधेयक तयार करून पार्लमेंटकडे पाठविलें. १९१० सालीं अश्लीलतेविषयीं एक आन्तरराष्ट्रीय परिषद् पॅरिस येथें भरली. इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी, रशिया व

अमेरिका इत्यादि देशांनीं या परिषदेनंतर एक करार करून अश्लील वाङ्मयास बंदी घालण्यासाठीं एकमेकांशीं सहकार्य करण्याचें ठरविलें. परंतु पहिलें महायुद्ध सुरू झाल्यामुळें इंग्लंडला या कायद्यांत बदल करण्यास वेळच मिळाला नाहीं.

युद्ध सुरू होण्यापूर्वी मात्र वृत्तपत्र व टीकाकार यांनीं एच्. जी. वेल्सच्या विरुद्ध एक आघाडीच उभारली होती. 'इन द डेज ऑफ कॉमेट' आणि 'ॲन वेरोनिका' या त्याच्या कादंबऱ्या बहुतेकांनीं अश्लील ठरविल्या. वेल्स त्या वेळीं समाजवादी असल्यामुळें सर्व समाजवादी अश्लील असतात असा आचरट आरोप डेली एक्सप्रेसनें केला, तर रेव्हरंड बुल नांवाच्या धर्मोपदेशकानें या कादंबऱ्यांवर खटला भरण्यासाठीं एक फंड काढला! १९०९ मध्यें तर मुडी, स्मिथ, बुटस् हीं वाचनालयें व लंडन टाइम्स हें वृत्तपत्र यांनीं एक खाजगी सेन्सॉरशिप स्थापन केल्याचें जाहीर केलें. या बातमीनें अनेक लेखक खवळून उठले. गॉस, ॲंथनी, होप इत्यादि लेखकांनीं या खाजगी सेन्सॉरशिपविरुद्ध टीकेचा भडिमार केला, आणि टाइम्स बुक क्लबची मुख्य ग्रंथपाल जॅनेट होगार्थ हिनें ह्या धोरणाच्या निषेधार्थ राजीनामा दिला! आम्हांला जें वाङ्मय अश्लील वाटतें तें आमच्या वाचनालयांत आम्ही ठेवणार नाहीं अशी धमकी या सेन्सॉरशिपनें दिली होती, परंतु प्रत्यक्ष कृति मात्र त्याप्रमाणें झाली नाहीं!

नाटकांच्या बाबतींत मात्र जुनेंच धोरण कायम होतें. शॉचें 'शुइंग अप ऑफ ब्लॅंको पॉसनेट', मेटरलिंकचें मोना वाना, गार्नेटचें ब्रेकिंग पॉइंट आणि बार्करचें 'वेस्ट' यांच्यावरची बंदी कायम होती. नाहीं म्हणायला इब्सेनच्या 'घोस्ट'ला १९१४ सालीं परवानगी देण्यांत आली. १९०७ सालीं बॅरी, गालस्वर्दी, यीटस् इत्यादि साहित्यिकांचें शिष्टमंडळ पंतप्रधान ॲस्क्वियला भेटलें, आणि नाटकांच्या बाबतींतील परवान्याची पद्धत नष्ट करावी अशी विनंती करण्यांत आली. आश्वासन मिळालें, पार्लमेंटनें एक समितिहि नेमली, पण परवान्याची पद्धत आजतागायत चालू आहे!

## डी. एच् लॉरेन्सची 'रेनबो'

या सुमारास गाजलेला एक खटला म्हणजे डी. एच्. लॉरेन्सची रेनबो

प्रसिद्ध केल्याबद्दल मेथ्यून कंपनीवरचा. लॉरेन्स ही कादंबरी तीन वर्षें लिहीत होता. परंतु खटला भरण्यांत आल्यावर मेथ्यून्सनें त्याला कळविलें-देखील नाहीं,–आणि गुन्हा कबूल करून सर्व प्रती नष्ट करण्याच्या हुकुमाला मान्यता दिली ! लॉरेन्सवर हें एक मोठें संकटच कोसळलें. कारण प्रकाशका-कडून कादंबरी खपेल या आशेनें त्यानें उचल घेतली होती. पुढील तीन वर्षें कांहींहि मिळण्याची आतां आशा उरली नाहीं. त्या कादंबरीबद्दलचा त्याचा कॉपीराइट नष्ट झाला, आणि अश्लील लेखक असा शिक्का नाहक त्याच्यावर बसला. या खटल्यामुळें तो इतका बदनाम झाला कीं, मासिकें आणि प्रका-शक त्याचें लिखाण स्वीकारीनात. ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेससाठीं युरोपच्या इतिहासावर लिहिलेलें पुस्तक त्याला टोपण नांवानें प्रसिद्ध करावें लागलें ! आणि हें सर्व ज्या खटल्यामुळें घडलें, त्या खटल्यांत स्वतःची बाजू मांडण्याची संधिदेखील त्याला मिळाली नाहीं !

## जेम्स जॉइसची युलिसिस

युद्धानंतर जेम्स जॉइसची ‘युलिसिस’ ही कादंबरी अतिशय गाजली. त्यांतील कांहीं भाग अश्लील असला, तरी कादंबरी इंग्रजी वाङ्मयांत अजरा-मर होईल असाच अभिप्राय ऑब्झर्व्हरसारखीं वृत्तपत्रें आणि अरनॉल्ड बेनेटसारखे टीकाकार यांनीं दिला. परंतु संडे एक्स्प्रेसच्या जेम्स डगलसनें मात्र जॉइसच्या विरुद्ध एक प्रचंड वावटळ उठवली. असें लिखाण चालू राहिलें तर ख्रिश्चन धर्म बुडेल, आणि सैतानाचें राज्य येईल,–असें लिहिण्या-पर्यंत डगलसनें मजल मारली ! ही कादंबरी इंग्लंडमध्यें प्रसिद्ध झाली नसल्या-मुळें सरकारला कांहींच करणें शक्य नव्हतें. परंतु कस्टम खात्यानें ५०० प्रती जप्त केल्या, आणि १९३३ सालीं त्याविरुद्ध झालेल्या अमेरिकेंतील प्रसिद्ध खटल्याचा निकाल लागेपर्यंत इंग्लंडमध्यें ती प्रसिद्ध करण्याची एकाहि प्रकाशकाची छाती झाली नाहीं. १९३७ सालीं प्रथम ती इंग्लंडमध्यें प्रसिद्ध झाली, आणि आजपर्यंत तिच्या चार आवृत्त्या निघाल्या आहेत.

## दुसरी आन्तरराष्ट्रीय परिषद

बावीस सालीं राष्ट्रसंघाच्या वतीनें जिनिव्हा येथें दुसरी अश्लीलताविरोधी आन्तरराष्ट्रीय परिषद् भरली, आणि चाळीस राष्ट्रांनीं या करारावर सही केली.

( आपल्या पिनल कोडांतहि या करारानुसार बदल करण्यांत आला. ) या परिषदेनंतर इंग्लंडमधील सरकारनें पुनश्च आक्रमक धोरण स्वीकारलें. त्या वेळचे गृहमंत्री सर विल्यम जॉन्सन–हिक्स या बाबतींत अतिशय कर्मठ होते, आणि साहित्यिकांविरुद्ध कडक उपाययोजना केली पाहिजे, असा त्यांचा आग्रह होता. या नवीन धोरणाचा पहिला तडाखा रॅडक्लिफ हॉल या लेखिकेच्या 'वेल्स ऑफ लोनलीनेस' या कादंबरीवर बसला. कादंबरींत दोन स्त्रियांमधील लैंगिक आकर्षणाचें वर्णन आहे हें खरें, परंतु जन्मतःच ही विकृति असलेल्या एका स्त्रीची ती एक अतिशय करुण कहाणी आहे. टाइम्स, टेलिग्राफ, सॅटरडे रिव्ह्यू इत्यादि वृत्तपत्रांनीं या कादंबरीची वाखाणणी केली, परंतु एक्सप्रेसच्या जेम्स डगलसनें नेहमींप्रमाणें हल्ला चढविला. या हल्ल्यानें घाबरून जाऊन प्रकाशकानें गृहमंत्र्यांच्या सल्ल्यावरून विक्री बंद केली. ही बातमी बाहेर पडल्यावर शॉ, वेल्स वगैरेंनीं गृहमंत्र्यांच्या या खाजगी सेन्सॉरशिपचा वृत्तपत्रांतून निषेध करून कादंबरीची विक्री चालू राहिली पाहिजे अशी मागणी केली. अशा स्त्रियांच्याबद्दल समाजानें सहानुभूतीनें विचार केला पाहिजे, हें पटवून देण्यासाठीं कर्तव्यबुद्धीनें ही कादंबरी मीं लिहिली असें लेखिकेनें निवेदन केलें. परंतु परिणाम मात्र उलटाच झाला. पॅरिसमध्यें ही कादंबरी छापून त्याच्या कांहीं प्रती इंग्लंडमध्यें येत आहेत असा सुगावा लागतांच सरकारनें या प्रती नष्ट कराव्या असा अर्ज न्यायालयांत दाखल केला. हा खटला लंडनचे मॅजिस्ट्रेट बिरन यांच्यापुढें उभा राहिला. आरोपीतर्फें डेस्मंड मॅकार्थी, प्रा. हक्स्ले यांसारखे चाळीस प्रख्यात साहित्यिक टीकाकार व शास्त्रज्ञ साक्षीदार म्हणून बोलाविण्यांत आले होते. परंतु कायद्याप्रमाणें असा साक्षी-पुरावा ग्राह्य ठरत नाहीं असा निर्णय देऊन न्यायालयानें त्यांच्या साक्षी घेतल्या नाहींत ! न्यायाधीशांनीं सर्व प्रती नष्ट कराव्या असा हुकूम दिला, आणि निकालपत्रांत कादंबरीचे साहित्यगुण मान्य करूनहि ती अश्लील आहे असें मत व्यक्त केलें. या निकालपत्रांतील कादंबरीवरची टीका फार अनुदार आणि कठोर होती. निकालपत्रांतील कांहीं वाक्यें लेखिकेला ऐकवेनात,–आणि रागानें ती भर कोर्टांत 'शेम् शेम्' म्हणून ओरडली ! या निकालावर अपील करण्यांत आलें. परंतु अपिलांत मॅजिस्ट्रेटचा निर्णय कायम करण्यांत आला. अपिलाचा निकाल लागल्यावर टी. एस्. एलिअट, ए.पी. हर्बर्ट,

व्हर्जिनिया वुल्फ, फॉस्टर, शॉ, बेनेट, स्ट्रॅची, हौसमन, मॅकार्थी इत्यादि पंचेचाळीस प्रथितयश साहित्यिकांनीं या निर्णयाविरुद्ध आणि सरकारच्या धोरणाविरुद्ध एक पत्रक प्रसिद्ध केलें, आणि कायद्यामध्यें त्वरित सुधारणा झाली पाहिजे अशी मागणी केली. परंतु सरकार बधलें नाहीं,–आणि १९४९ पर्यंत ही कादंबरी पुन्हा प्रसिद्ध होऊं शकली नाहीं !

### स्लिवलेस एरंड

पुढल्या वर्षी नोरा जेम्सच्या स्लिवलेस एरंड या कादंबरीवर खटला भरण्यांत आला. या कादंबरींतील कांहीं व्यक्ति दोन दिवस एकत्र येतात, आणि आपापल्या मनांतील अतिशय गुप्त, सुप्त आणि खाजगी विचार एकमेकांस सांगतात,–अशी मध्यवर्ती कल्पना आहे. न्यायालयानें ती अश्लील ठरविली आणि सर्व प्रती नष्ट करण्यांत आल्या. समाजांतील एका वर्गाच्या खाजगी जीवनाचें चित्र या कादंबरींत रंगविलें आहे, आणि कादंबरी वाचून संपविल्यावर अशा वर्गाबद्दल तिरस्कारच उत्पन्न होतो, असा आरोपीतर्फे बचाव करण्यांत आला होता. परंतु न्यायालयानें तो अमान्य केला ! त्या सालचा खळबळ उडविणारा दुसरा खटला म्हणजे लॉरेन्सवरचा. त्याची 'लेडी चॅटर्लीज् लव्हर' नुकतीच फ्लॉरेन्स येथें प्रसिद्ध झाली होती. त्यावर येवढा गहजब झाला कीं, जॉन बुल या साप्ताहिकानें तर लॉरेन्सला सर्वांनीं वाळींत टाकावें अशी सूचना केली ! पॅन्झीज् या त्याच्या कवितासंग्रहाचें हस्तलिखित पोस्ट-खात्यानें जप्त केलें. पार्लमेंटमध्यें फारच ओरड झाल्यामुळें शेवटीं तें प्रकाशकाला पाठविण्यांत आलें,परंतु त्यांतील चौदा कविता गाळाव्या अशी सूचना करण्यांत आली – आणि त्याप्रमाणें त्या चौदा कविता गाळून संग्रह प्रसिद्ध झाला. यानंतर थोड्याच दिवसांत लॉरेन्सच्या चित्रांच्या प्रदर्शनावर पोलिसांनीं धाड घातली, आणि २५ चित्रांपैकीं २३ चित्रें जप्त केलीं. सर विल्यम ओरपेन, ऑगस्टस जॉन, प्रो. ब्लेर इत्यादि नामवंत चित्रकार आणि प्राध्यापक आरोपीतर्फे साक्ष देण्यास तयार होते. परंतु ८२ वर्षांचे न्यायाधीश मिड यांनीं साक्षीपुरावा सादर करण्यास परवानगी नाकारली, आणि सर्व चित्रें अश्लील ठरवून प्रदर्शन बंद करायला लावलें ! या घटनेवर लॉरेन्सनें एक हृदय पिळवटून टाकणारी कविता लिहिली आहे.

यानंतर दोन वर्षांनीं कौंट डी. मोनटालक याला तर अश्लील वाङ्मय

दा. क्र. 13680

प्रसिद्ध केल्याबद्दल सहा महिन्यांची जबर शिक्षा ठोठावण्यांत आली. दुसऱ्या एका खटल्यांत पेट्रोनियसचे साटीरींकॉन हा ग्रीक कवितांचा एक संग्रह अश्लील ठरवून न्यायालयानें सर्व प्रती नष्ट करण्याचा हुकूम दिला. हाच प्रकार हॅनलेची 'बॉय,' व वॅलॅस स्मिथची 'बेसी कॉटर'च्या बाबतींत झाला. पहिल्या कादंबरींतील नायकावर जहाजावरच्या एका खलाशानें बलात्कार केल्याचें वर्णन आहे, म्हणून ती अश्लील ठरविण्यांत आली. आणि प्रकाशकाला दंड करण्यांत आला. आश्चर्य म्हणजे खटला करण्यापूर्वी चार वर्षे ती प्रसिद्ध झाली होती, आणि त्या वेळीं न्यू स्टेट्समन आदि पत्रांनीं तिची फार प्रशंसा केली होती! दुसऱ्या कादंबरींत अमेरिकेंतील कुंटण-खान्याचें वर्णन आहे,—म्हणून ती अश्लील ठरली. प्रकाशकाला दंड झाला. याहि कादंबरीची बहुतेक वृत्तपत्रांनीं वाखाणणी केली होती! पस्तीस सालीं एडवर्ड चार्लस्च्या 'सेक्शुअल इंपल्स'बद्दल खटला भरण्यांत आला. आणि याहि खटल्यांत प्रा. ज्युलियन हक्सले, डॉ. रॉयडेन इत्यादि तज्ज्ञांचा पुरावा विचारांत घेण्याचें न्यायालयानें नाकारलें, आणि सर्व प्रती नष्ट करण्यांत आल्या!

* * *

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम 34622 वि: निबंध
क्रमांक 1555 नों दि: 6/7/75

## ४ : ब्रिटिश साहित्यिकांची चळवळ

अश्लीलताविरोधी मोहीम युद्धकाळांतहि चालू राहिली, आणि बेचाळीस सालीं जेम्स हॅडले चेजच्या 'मिस कॅलगॅन कम्स टु ग्रीक' वर बंदी घालण्यांत आली. युद्ध संपल्यानंतर साहजिकच अधिक मोठ्या प्रमाणांत मोहीम उघडण्यांत आली. बॅर्नार्ड आणि आल्फ्रेड के यांना अॅकॅडमी ऑफ लव्ह, सोहो स्ट्रीट गर्ल अशीं उत्तान कामुक पुस्तकें प्रसिद्ध करण्याबद्दल तुरुंगांत पाठविण्यांत आलें; आणि ५० लाख प्रती खपलेलीं हॅन्क जॉन्सन पुस्तकें नष्ट करण्याचे हुकूम ५२ वेळां देण्यांत आले! अमेरिकेंत सैन्यांतील सैनिकांचें जीवन रंगविणारी नॉर्मन मिलरची 'नेकेड अँड द डेड' ही कादंबरी अश्लील आहे अशी ओरड १९४९ सालीं संडे टाइम्सनें करून पाहिली, परंतु मजूर पक्षाचे अॅटर्नी जनरल हार्टले शॉक्रॉस यांनीं खटला भरण्याचें नाकारलें ! !

### वेगळें वळण

त्रेपन्न सालानंतर मात्र सरकारी धोरण बदललें. सरन्यायाधीश गोडार्ड यांनीं अश्लीलतेविरुद्ध सरकार कांहींच करीत नाहीं असें कांहीं खटल्यांचे निकाल देतांना सूचित केलें होतें. त्याच सुमारास आन्तरराष्ट्रीय पोलिस परिषदेंतहि या बाबतींत बरीच खडाजंगी झाली होती. आणि पुरोगामित्वाचें वावडें असलेल्या हुजूर पक्षाचें मंत्रिमंडळहि अधिकारावर आलेलें होतें. या

सर्व गोष्टींचा परिणाम असा झाला कीं, १९५४ पासून ५ महत्त्वाच्या पुस्तकांबद्दल खटले भरण्यांत आले. पहिला खटला मारगॉट ब्लँडच्या ज्युलिया या कादंबरीबद्दल वर्नर लॉरी या प्रकाशकांवर भरण्यांत आला. आरोपीनें गुन्हा कबूल केल्यामुळें फक्त ३० पौंड दंड झाला. फिलँडररचे प्रकाशक सेकर अँड वारबग यांनीं मात्र खटला लढविण्याचें ठरविलें, आणि धैर्यानें खटला लढवून इंग्रजी साहित्याला आणि कायद्याला उपकृत करून ठेविलें. कारण या खटल्यांतील न्यायमूर्ति स्टेबल यांच्या निर्णयामुळें इंग्रजी कायद्याला एक वेगळेंच वळण लागलें.

## न्या. मू. स्टेबळ यांचे उदार विचार

फिलँडरर ही न्यूयॉर्कमधील एका जाहिरातीच्या धंद्यांत काम करणाऱ्या गृहस्थाची कथा आहे. एका सुंदर स्त्रीशीं त्याचें लग्न झालेलें असतें, आणि त्याचा संसारहि सुखाचा असतो. परंतु स्त्रियांविषयींचें त्याला असलेलें आकर्षण दिवसेंदिवस वाढतच जातें, आणि एकामागून एक त्याचीं प्रेमप्रकरणें असफल होतात. एकाहि प्रकरणांत त्याला संपूर्ण समाधान मिळत नाहीं. अमेरिकेंतील अनेक पुरुषांत असलेला लैंगिक बाबतींतील मानसिक न्यूनगंड दर्शविण्याचा प्रयत्न लेखकानें या कादंबरींत केला आहे. इंग्लंडमध्यें न्यू स्टेट्समन, स्पेक्टेटर वगैरे पत्रांनीं कादंबरी वाङ्मयीनदृष्टया वरच्या दर्जाची आहे असा अभिप्राय दिला. परंतु सरकारनें मात्र कादंबरी अश्लील आहे असा आरोप करून खटला भरला. न्या. मू. स्टेबल यांनीं पहिल्यापासूनच अतिशय सुसंस्कृतपणा दाखविला. आरोपीस पिंजऱ्यांत उभा न करतां वकिलाच्या शेजारीं बसण्यास जागा दिली. ज्यूरींना घरीं पाठवून देऊन सबंध कादंबरी वाचून येण्यास सांगितलें, आणि निवडक उतारेच वाचून मत न बनविण्याचा सल्ला दिला. ज्यूरींना आदेश देतांना त्यांच्या निर्णयावर साहित्यिकांचें स्वातंत्र्य कसें अवलंबून आहे याची जाणीव करून दिली. "कादंबरी वाचून घृणा उत्पन्न झाली किंवा तिच्यामुळें प्रचलित मूल्यांना धक्का बसेल असें जरी तुम्हांला वाटलें तरी ती अश्लील ठरत नाहीं. एखाद्या चौदा वर्षांच्या मुलीनें ती वाचली तर तिला काय वाटेल याची कल्पना करून तुम्ही साहित्याचा दर्जा आणि अभिरुचि ठरवूं शकत नाहीं. ती कसोटी

मान्य केली तर वाङ्मयांत फक्त बालवाङ्मयच शिल्लक राहील. तरुणांच्या मनांत वाईट विचार केवळ वाचनानेंच येत नाहींत. मनुष्य वयांत येऊं लागल्यावर जें मानसिक स्थित्यंतर घडून येतें, त्या अवस्थेंत त्याला योग्य मार्गदर्शन झालें नाहीं तर वाईट विचार स्वाभाविकतःच येतात. हा त्या स्थित्यंतराचा आणि अवस्थेचा परिणाम आहे, वाचनाचा नाहीं. हें मार्गदर्शन पालक आणि शिक्षक यांनीं केलें नाहीं तर वाङ्मयाला दोष देण्याचें काय कारण ? ही कादंबरी न्यूयॉर्कमधील एका अमेरिकन माणसाबद्दल आहे, म्हणून न्यूयॉर्कचें जीवन आणि अमेरिकन मन यांचा विचार करूनच तुम्हीं निर्णय दिला पाहिजे. कादंबरींत मानवी प्रेम आणि समागम यांचें वर्णन आहे हें खरें. सरकारचें म्हणणें आहे कीं, हें सर्व गलिच्छ आणि अश्लील आहे. मानवी प्रेमाचें आणि समागमाचें वर्णन कदाचित् सदभिरुचीला सोडून असेल, परंतु मानवी प्रेम आणि समागम हे गलिच्छ आणि अश्लील विषय आहेत असें कसें म्हणतां येईल ? ज्या कादंबरींत कांहीं विचार नाहीं, संदेश नाहीं, बोध नाहीं, केवळ अशा प्रकारचीं वर्णनेंच आहेत ती कादंबरी निश्चित अश्लील ठरेल. परंतु ही कादंबरी अशी आहे का ? आणि या प्रश्नाचें उत्तर देण्यापूर्वीं हें लक्षांत ठेवा, कीं सामाजिक नीति सुधारण्याच्या उत्साहांत कदाचित् आपण प्रस्थापित कायद्यालाच धक्का देऊं.'' न्यायालयानें अशा प्रकारचा आदेश दिल्यानंतर ज्यूरींना मत बनविण्यास वेळ लागला नाहीं आणि ताबडतोब आरोपी निर्दोषी आहे असा निर्णय दिला ! यानंतरच्या व्हिव्हियन कोनेलच्या 'सप्टेंबर इन क्विन्झ' या कादंबरीवरच्या खटल्यांत मात्र न्या. मू. स्टेबलनें केलेला हा अश्लीलतेचा अर्थ न्यायालयानें मान्य केला नाहीं. उलट ती कादंबरी वाचून एखाद्या आर्चबिशपच्या मनावर काय परिणाम होईल याचा विचार करूं नका, तरुणतरुणींच्या अपरिपक्व मनावर काय परिणाम होईल हें ठरवा, असा आदेश ज्यूरींना देण्यांत आला, आणि ज्यूरीनें आरोपीस दोषी ठरविल्यामुळें ५०० पौंड दंड करण्यांत आला.

## ज्यूरींतील मतभेद

त्याच वर्षीच्या दुसऱ्या खटल्यांत ज्यूरींत एकमत न झाल्यामुळें दोनदां ज्यूरी बदलावी लागली, आणि अखेर कादंबरी अश्लील नाहीं असें ठरलें ! या कादंबरीचें नांव 'द इमेज अँण्ड द सर्च.' वॉल्टर बॅक्स्टर यानें ती

लिहिली आहे. त्याची पहिली कादंबरी 'लुक डाउन इन मर्सी' ही १९५१ सालीं, प्रसिद्ध झाली, आणि अतिशय गाजली. गेल्या महायुद्धांत जंगलांत लढलेल्या सैनिकांच्या जीवनांतील समलिंगी आकर्षणाचें चित्र या कादंबरींत रंगविलें आहे. या कादंबरीबद्दल कांहींहि उपाययोजना सरकारनें केली नाहीं. परंतु दुसरी कादंबरी प्रसिद्ध झाल्यावर मात्र १९५४ सालीं खटला भरण्यांत आला. या कादंबरींतील नायिका इंग्लंड, फ्रान्स, स्पेन, हिंदुस्थान इत्यादि देशांत प्रवास करते, आणि तिचीं प्रेमप्रकरणें अयशस्वी ठरतात. या वैफल्यामुळें ती पाप या कल्पनेचा विचार करूं लागते, आणि शेवटीं धार्मिक बनते असें कथानक आहे. पहिल्यांदा खटला न्या. मू. डेवलिन यांच्यापुढें मांडला. परंतु तीन तास चर्चा करूनहि ज्यूरींत एकमत होईना. म्हणून त्यांनीं ती ज्यूरी बरखास्त केली. नंतर खटला न्या. मू. लिन्स्की यांच्यापुढें चालला आणि त्यांनीं कादंबरी अश्लील आहे असें सूचित केलें. परंतु दोन तास खलबत करूनहि ज्यूरींत एकमत झालें नाहीं. अखेर इंग्रजी कायद्याच्या संकेताप्रमाणें सरकारनें तिसऱ्यांदा खटला न भरल्यामुळें आरोपी निर्दोषी ठरला. याच सुमारास चार्लस मॅक्ग्रोच्या 'मॅन इन कंट्रोल' या कादंबरीचा खटलाहि चालू होता. सतरा वर्षांच्या एका मुलीला समलिंगी संबंधाचें आकर्षण असलेली एक स्त्री बिघडविते,–अशा अश्लील कथासूत्रावर ही कादंबरी रचलेली आहे,–असा आरोप सरकारतर्फे करण्यांत आला होता. परंतु १३ मिनिटांत कादंबरी अश्लील नाहीं असा निर्णय ज्यूरींनीं दिला !

## साहित्यिकांची चळवळ

५४ सालापासून भरण्यांत आलेल्या या पांच खटल्यांमुळें साहित्यिकवर्ग जागा झाला, आणि लेखकसंघानें ए. पी. हर्बर्ट यांच्या अध्यक्षतेखालीं एक समिति नेमली. इंग्लंडचा कायदा कसा तर्कदुष्ट आहे हें समितीनें दाखवून दिलेलें आहे, आणि समितीच्या प्रयत्नामुळें यासंबंधींच्या कायद्यांत सुधारणा करणारें विधेयक नुकतेंच पास झालें आहे. इंग्लिश कायद्यांतील खालील दोष दाखविले गेले. (१) अश्लीलतेची १८६७ सालीं करण्यांत आलेली व्याख्या व कसोटी अपुरी आहे. त्या व्याख्येप्रमाणें एखादें लिखाण वाचून विकृत लैंगिक विचार वाचकाच्या मनांत निर्माण होण्याची शक्यता असेल तर तें अश्लील ठरतें. विचारांपेक्षां प्रवृत्ति आणि कृतीवर त्याचा काय परि-

णाम होतो हें लक्षांत घेणें अधिक महत्त्वाचें आहे. अमेरिकेंत प्रवृत्ति आणि कृति यांना अधिक महत्त्व दिलें जातें. मॅसॅच्युसेट न्यायालयांतील एका न्यायाधीशानें 'फॉरएवर ॲम्बर' ही कादंबरी अश्लील नाहीं हें ठरवितांना याचें फार मार्मिक वर्णन केलें आहे. "कादंबरी वाचून झोपावेंसें वाटतें, परंतु कोणाबरोबर तरी नाहीं!" ( While conducive to sleep it is not conducive to sleep with members of the opposite sex. ) इंग्रजी कायदा मात्र इतका विचित्र आहे कीं, "त्या रात्रीं त्या वेगळ्या झाल्या नाहींत" यापेक्षां एकहि वाक्य अश्लील नसतांनासुद्धां 'वेल्स ऑफ लोनलीनेस' ही कादंबरी अश्लील ठरली! ( २ ) तरुणांवर लिखाणाचा काय परिणाम होईल ही कसोटीहि विसाव्या शतकांत अयोग्य आहे. ही कसोटी लावली तर सर्व अभिजात वाङ्मय अश्लील ठरेल. ( ३ ) कोणत्या परिस्थितींत लिखाण प्रसिद्ध झालें याचा विचार न्यायालयें करीत नाहींत. रोमच्या प्राचीन अवशेषांतील चित्रें किंवा डिकॉमिनानसारखें साहित्य स्वस्त दरांत विकलें तर तें लगेच अश्लील ठरतें! ( ४ ) या गुन्ह्याबद्दल कमाल शिक्षा कायद्यांत निश्चित केलेली नाहीं. शिक्षा किती द्यायची हें सर्वस्वीं न्यायाधीशावर सोपविणें योग्य नाहीं. ( ५ ) एखाद्या पुस्तकाच्या प्रकाशकावर किंवा मुद्रकावर खटला भरला तर आपलें म्हणणें मांडण्याचा हक्क किंवा संधि इंग्रजी कायद्यानें लेखकाला दिलेली नाहीं. ( ६ ) पुस्तक प्रसिद्ध झाल्यानंतर किती दिवसांत खटला भरावा यावरहि कांहीं बंधन नाहीं. ( ७ ) एखाद्या पुस्तकांतील निवडक उतारे घेऊन त्यावर निर्णय देणें योग्य नाहीं. पॅजेट वि. वॉटसन ( १९५२ ) या खटल्यांत तर केवळ पुस्तकाचें वेष्टण अश्लील आहे म्हणून सर्व प्रती नष्ट करण्यांत आल्या! ( ८ ) लिखाण मुद्दाम बुद्ध्या ( intention ) अश्लील भाषेंत लिहिलें आहे किंवा नाहीं, आणि लिखाण कोणत्या हेतूनें व उद्देशानें ( motive ) लिहिलें आहे याचा विचार केला जात नाहीं. ( ९ ) तज्ज्ञ, शास्त्रज्ञ, कलावंत अगर साहित्यिक यांचा साक्षी-पुरावा दाखल करून घेतला जात नाहीं. ( १० ) तशाच स्वरूपाचें लिखाण असलेले इतर ग्रंथ अगर पुस्तकें पुराव्यादाखल न्यायालयाच्या नजरेस आणून देण्याचा हक्क आरोपीला नाहीं. ( ११ ) अजूनहि इंग्रजी कायद्याप्रमाणें कोणाहि व्यक्तीला एखाद्या पुस्तकाबद्दल खाजगी फिर्याद दाखल करतां येते.

हे दोष काढून टाकण्यासाठीं १९५५ सालापासून हर्बर्ट समितीनें आणि लेखकसंघानें सतत प्रयत्न केला, आणि यांतील बरेचसे दोष आतां नवीन विधेयकानें काढून टाकण्यांत आले आहेत. अमेरिकेंतील कायदा यापेक्षां सौम्य आहे, तर आयर्लंडचा कायदा यापेक्षांहि कडक आहे.

## अमेरिकेंतील कायदा

अमेरिकेच्या वैशिष्ट्यपूर्ण राज्यव्यवस्थेमुळें तेथें दोन प्रकारचे कायदे आणि दोन प्रकारचीं न्यायालयें आहेत. मध्यवर्ती ( फेडरल ) आणि घटक-राज्यांचीं. प्रत्येक राज्यांत या बाबतींत वेगळा कायदा आहे; आणि प्रत्येक राज्याचे कायदे आणि न्यायव्यवस्था यांच्यामध्यें तपशीलाचा एवढा मोठा फरक आहे कीं, या सर्वांचा अभ्यास करून त्याविषयीं कांहीं विधानें करणें जवळजवळ अशक्य आहे. म्हणून तेथील मुख्यतः मध्यवर्ती कायद्याचाच विचार येथें केला आहे.

१८२१ सालीं ' मेमॉयर्स ऑफ ए वुमन ऑफ प्लेझर ' या पुस्तकावर मॅसेच्युसेट्स न्यायालयांत झालेला खटला हा तेथील यासंबंधांतील पहिला खटला असावा. सर्वसामान्य कायद्यानें अश्लीलता हा गुन्हा ठरतो असा निर्णय या खटल्यांत देण्यांत आला. त्यानंतर अमेरिकन वृत्तपत्रांनीं जरी अनेक पुस्तकांवर अश्लील म्हणून हल्ला केला तरी १८६० च्या यादवी युद्धापर्यंत अश्लीलतेबद्दल क्वचितच खटले भरलेले आढळतात. १८४२ सालीं एक कायदा करून मध्यवर्ती सरकारनें अश्लील वाङ्मयाची आयात करण्यावर बंदी घातली. यादवी युद्धानंतर सतत चाळीस वर्षें अँथनी कॉमस्टॉक नांवाच्या गृहस्थानें अश्लीलतेविरुद्ध एक मोहीम चालू ठेवली. त्याचें दृश्यफळ म्हणजे मध्यवर्ती सरकारनें १८५७ व १८७३ मध्यें दोन कायदे पास करून एतद्विषयक कायदा अधिक व्यापक केला. अश्लील वाङ्मय पोस्टानें पाठविण्यास बंदी घालण्यांत आली. हाच कायदा थोड्याफार फरकानें आजहि अंमलांत आहे. या कायद्याचा भंग केल्यास जास्तींत जास्त ५ वर्षें कारावास आणि ५ हजार डॉलर दंड अशी शिक्षा देतां येते. मार्च १९५५ मध्यें याच कायद्याचा वापर करून ॲरिस्टोफेनीसच्या लिसिसस्ट्रेटाच्या इंग्लंडहून आलेल्या प्रती पोस्टखात्यानें जप्त केल्या होत्या, परंतु नंतर त्या परत देण्यांत आल्या.

## अमेरिकेंत 'हिकलीन' कसोटी

इंग्लंडमध्यें सर्वमान्य झालेली अश्लीलतेची हिकलीन कसोटी व व्याख्या अमेरिकेनेंहि १८७९ मध्यें एका खटल्यांत स्वीकारली. १९१३ सालच्या एका खटल्यांत न्या. मू. हँड यांनीं या कसोटीच्या पूर्णत्वाविषयीं शंका व्यक्त केली, परंतु निर्णय मात्र त्या कसोटीनुसारच दिला. १९३० सालीं थिओडोर ड्रीसरची 'ॲन अमेरिकन ट्रॅजेडी' ही कादंबरी केवळ त्यांतील एका उताऱ्यामुळें मॅसेच्युसेटस् न्यायालयानें अश्लील ठरवली ! ( याच कादंबरीवर प्लेस इन द सन हा चित्रपट काढण्यांत आला होता. ) कारण हिकलीन कसोटीप्रमाणें तो उतारा अश्लील ठरत होता ! सबंध कादंबरीचा विचार करण्याचें न्यायाधीशांनीं नाकारलें, आणि कांहीं प्रकरणें आणि पानें यांचाच विचार केला !

## क्रान्तिकारक बदल

१९३३ सालीं मात्र अश्लीलतेबद्दलच्या तेथील कायद्यांत क्रान्तिकारक बदल झाला. आणि याचें कारण म्हणजे न्या. मू. वुल्से यांनीं जेम्स जॉइसच्या 'युलिसिस' कादंबरीवरच्या खटल्यांत दिलेला निर्णय. या खटल्यांतील न्या. मू. वुल्से यांचें निकालपत्र म्हणजे साहित्य आणि कायदा यावरचा एक छोटासा प्रबंधच आहे. कादंबरींतील सर्वांत अश्लील भाग म्हणजे लिओपोल्ड ब्लुमच्या बायकोचें स्वगत. परंतु तेंसुद्धां कारुण्यपूर्ण असल्यामुळें अश्लील ठरत नाहीं असा त्यांनीं निर्णय दिला. कारण कोणतेंहि वाङ्मय अश्लील ठरविण्यापूर्वी कांहीं निकष लावले पाहिजेत असें मत त्यांनीं व्यक्त केलें, तें म्हणजे—( १ ) कोणत्या हेतूनें ( Purpose ) लेखकानें लिहिलें आहे ? ( २ ) एकदोन निवडक उतारेच विचारांत न घेतां सबंध पुस्तकाचा एकूण परिणाम ( Dominant effect ) काय होतो ? ( ३ ) वाचकावर त्याचा परिणाम काय होईल हें ठरवितांना सर्वसामान्य वाचक नजरेपुढें असला पाहिजे. ( ४ ) त्या वाङ्मयाचे वाङ्मयीन आणि कलात्मक गुणहि लक्षांत घेतले पाहिजेत.

कांहीं राज्यांनीं मात्र हा निर्णय मान्य केलेला नाहीं. उदाहरणार्थ मॅसेच्युसेट्स आणि कॅलिफोर्निया. मॅसेच्युसेटस्मधील एका खटल्यांत लेखकाचा हेतु आणि

पुस्तकावर वृत्तपत्रांतून आलेले अभिप्राय याविषयीं आरोपीनें सादर केलेला पुरावा न्यायालयानें स्वीकारला नाहीं. हेन्री मिलरच्या ' ट्रॉपिक ऑफ कॅन्सर आणि ट्रॉपिक ऑफ कॅपरीकॉर्न ' या पुस्तकांवरील खटल्यांत कॅलिफोर्नियाच्या न्यायालयानें वाङ्मयीन टीकाकारांचीं मतें अग्राह्य ठरविलीं. न्यूयॉर्क न्यायालयानें मात्र युलिसिस खटल्यांतील निर्णय मान्य करून अर्स्किन काल्डवेलची ' गॉडस् लिट्ल एकर ' ही कादंबरी अश्लील नाहीं असा निर्णय दिला.

## घटनात्मक मुद्दा

अश्लीलताविषयक कायद्यामुळें अमेरिकेच्या घटनेनें दिलेल्या भाषणस्वातंत्र्यावर गदा येते, असा घटनात्मक मुद्दा ' एडमंड विल्सन 'च्या ' मेमॉअर्स ऑफ हिकट कौंटी ' या पुस्तकावरील खटल्यांत निर्माण केला होता. परंतु सुप्रीम कोर्टांत न्यायाधीशांत त्याविषयीं एकमत न झाल्यामुळें हा मुद्दा अनिर्णित राहिला. न्या. मू. जॅकसन यांनीं असे उद्‍गार काढले कीं, " लिखाणाचा वाङ्मयीन दर्जा पाहून जर आम्ही घटनात्मक प्रश्नांवर निर्णय देऊं लागलों तर हें न्यायालय म्हणजे ' अश्लीलतेचें सर्वोच्च न्यायालय ' ( High court of obscenity ) होईल ! "

इंग्लंडपेक्षां अमेरिकेंतील मध्यवर्ती कायदा जरी अधिक सौम्य, उदार आणि पुरोगामी असला तरी तेथेंहि अश्लीलतेविरुद्ध सतत कार्य करणाऱ्या खाजगी संस्था आहेत. त्यांतील विशेष उल्लेखनीय म्हणजे रोमन कॅथॉलिक पंथाच्या वर्चस्वाखालीं असलेली नॅशनल ऑर्गनायझेशन फॉर डिसेंट लिटरेचर ही संस्था. या संस्थेच्या अनेक ठिकाणीं शाखा आहेत, व तिच्या प्रयत्नांमुळें जॉर्जिया, मिनिसोटा, डिट्रॉईट वगैरे घटक राज्यांतील कायदे अधिक कडक झाले आहेत. या संस्थेतर्फे त्यांना अश्लील वाटणाऱ्या वाङ्मयाविरुद्ध पद्धतशीर प्रचार करण्यांत येतो. उदाहरणार्थ, सॉमरसेट मॉमची 'पेंटेड व्हेल', झोलाची ' नाना ', आणि विल्यम फॉकनरची ' सॅक्चुअरी ' या कादंबऱ्या या संस्थेनें अश्लील ठरविल्या आहेत. ' पॉकेट बुकस् ' प्रसिद्ध होऊं लागल्यापासून तर या संस्थेनें आपलें कार्य अधिक जोरांत चालू केलें आहे. कारण या पुस्तकांचा खप अमेरिकेंत प्रचंड आहे. उदाहरणार्थ, १९५३ मध्यें १२०० पॉकेट बुकस्च्या ३० कोटी प्रती खपल्या होत्या ! तीच गोष्ट ' कॉमिक्स् 'ची. अमेरिकेंत महिना ९ कोटी कॉमिक्स्च्या प्रती खपतात ! आणि बऱ्याचशा

'कॉमिक्स्'मध्यें अश्लीलता भरपूर असते,—वाङ्मयीन गुण शून्य असतात!! न्यूयॉर्क राज्यानें या 'कॉमिक्स्'वर बंदी घालणारा कायदा १९४८ सालीं पास केला. परंतु सुप्रीम कोर्टानें तो अवैध ठरविला. त्यानंतर पुन्हा दुसरा कायदा कांहीं सुधारणा करून पास केला; परंतु राज्यपाल डयुई यांनीं मान्यता देण्याचें नाकारून तो फेटाळून लावला.

## एक मोठा धंदा

१९५२ सालीं मध्यवर्ती विधिमंडळाच्या कनिष्ठ सभागृहानें उत्तान कामुक लिखाणाबद्दल एक समिति नेमली. या समितीच्या अहवालावरून असें दिसतें कीं, असें लिखाण प्रसिद्ध करणें हा अमेरिकेंतला एक मोठा धंदा होऊन बसला आहे. फायद्यासाठीं वाटेल त्या प्रकारचें लिखाण व्यापारी प्रसिद्ध करतात. एकट्या न्यूयॉर्क शहरांत असें लिखाण प्रसिद्ध करणाऱ्या बारा कंपन्या आहेत, आणि त्यांच्याजवळ अशा लिखाणाचा प्रचंड स्टॉक आहे. १९५४ सालीं कॅलिफोर्निया विद्यापीठानें कॉमिक प्रसिद्ध करण्याच्या व्यापाराची पाहणी केली होती. या पाहणीनुसार अमेरिकेंत दर वर्षी या धंद्यांत १० कोटी डॉलर्सची उलाढाल होते, आणि प्राथमिक व माध्यमिक शाळांच्या पुस्तकांवर होणाऱ्या खर्चापेक्षां जास्त खर्च या 'कॉमिक्स'वर होतो! आणि शालेय विद्यार्थ्यांपैकीं २५ टक्के, कॉलेज विद्यार्थ्यांपैकीं १६ टक्के, आणि शिक्षकांपैकीं १२ टक्के लोक हीं कॉमिक्स वाचतात!! या समितीनें, तसेंच १९५५ च्या दुसऱ्या एका समितीनेंहि कायद्यांत कांहीं बदल करावेत अशी सूचना केली. परंतु अद्याप तसा कांहीं बदल झालेला दिसत नाहीं. कारण कायद्यांत फार मोठा बदल करण्याऐवजीं या धंद्यांतील लोकांनींच सुधारणा करावी असाहि सल्ला या समित्यांनीं दिलेला आहे.

या त्रोटक समालोचनावरून असें दिसून येतें कीं, इंग्लंडपेक्षां अमेरिकेचा कायदा सौम्य आहे. याउलट आयर्लंडमधील कायदा अधिक कडक आहे. राष्ट्रकुलामध्यें आयर्लंड हा असा एकच देश आहे कीं, जेथें या बाबतींत संपूर्ण सरकारी सेन्सॉरशिप आहे. नाटकांविषयीं मात्र तेथें फारशीं बंधनें नाहींत ही आश्चर्याची गोष्ट आहे. याचें एक कारण म्हणजे आयर्लंडच्या रंगभूमीचा विकास गेल्या सुमारें पन्नास वर्षांतच झाला.

* * *

## ५ : आयर्लंडचा सोवळा कायदा

आयर्लंडच्या पार्लमेंटनें १९२६ सालीं एक समिति नेमली. अश्लीलते-बद्दल १९२२ ते १९२६ च्या दरम्यान जरी पांचच खटले झाले असले तरी असें वाङ्मय फार वाढलें आहे असें मत व्यक्त करून एक सरकारी सेन्सॉर बोर्ड स्थापन करावें अशी शिफारस समितीनें केली.

### फाजील सोवळा कायदा

ह्या बोर्डानें तरुणांच्यांत पसरणाऱ्या वाङ्मयाचा विचार करावा ही सूचना समितीनें मान्य केली नाहीं. उलट संततिनियमनाच्या प्रचारावर बंदी घालावी ही सूचना एकमतानें मान्य केली.

या शिफारशी अंमलांत आणण्यासाठीं १९२८ सालीं सरकारनें एक विधेयक आणलें. सरकारतर्फे साहित्याची तपासणी होऊन त्यावर जर बंदी घातली जाऊं लागली तर आयर्लंडचें जगांत हंसें होईल असा इषारा प्रा. टीरनी यांनीं दिला. मी काय वाचावें हें चारपांच चक्रम (Cranks) लोकांना ठरविण्याचा काय अधिकार आहे असा प्रश्नहि सर जेम्स क्रेग यांनीं केला. यीटस्नें तर या विधेयकावर टीकेचा भडिमार केला; आणि असें सरकारी नियंत्रण घालण्यांत आलें तर ओरिजन ऑफ स्पेसीज, मार्क्सचें कॅपिटल, बाल्झाक, फ्लॉबे, प्राऊस्टच्या सर्व कादंबऱ्या, अर्धें ग्रीक व रोमन अभिजात साहित्य, सर्व प्रेमकाव्य आणि अनातोल फ्रान्सचें सर्व लिखाण

बेकायदेशीर ठरेल असें भविष्य केलें. परंतु हें विधेयक पास झालें आणि या कायद्यान्वयें पांच सभासदांचें सेन्सॉर बोर्ड स्थापन करण्यांत आलें. आतांपर्यंत या बोर्डानें ४००० पुस्तकांवर आणि ४०० नियतकालिकांवर बंदी घातली आहे, आणि यीट्सचें भविष्य दुर्दैवानें खरें ठरलें आहे ! कारण या पुस्तकां-मध्यें 'हॉट डेम ऑन कोल्ड स्लॅब'सारख्या उत्तान कामुक पुस्तकापासून ते प्राऊस्टच्या 'रिमेंबरन्स ऑफ थिंग्ज पास्ट' किंवा आंद्र जीडच्या 'इफ आय डाय'पर्यंतच्या सर्व पुस्तकांचा सरसकट समावेश करण्यांत आला आहे ! नोबेल प्राइज मिळालेल्या चार साहित्यिकांच्या निवडक लिखाणावर बंदी घालण्यांत आली आहे ! याशिवाय चार्लस मॉर्गनची 'दी फौंटन', सॉमरसेट मॉमची 'पेंटेड व्हेल', आल्डस हक्स्लेची 'पॉइंट कौंटर पॉइंट', जॉर्ज ऑर्वेलची 'नाइनटीन एटी फोर' आणि एच. जी. वेल्सच्या चार, ह्यू वॉलपोलच्या दोन आणि अलबर्ट मोरावियाच्या तीन कादंबऱ्या बहिष्कृत केल्या आहेत. आयर्लंड हा कॅथॉलिक देश, परंतु ब्रुस मार्शल किंवा ग्रॅहॅम ग्रीन यांसारखे कॅथॉलिक लेखकहि या धोरणांतून सुटलेले नाहींत. या सर्वांवर कळस म्हणजे सदरलंडचें 'लॉज ऑफ लाइफ' आणि ब्रिटिश सरकारचा रॉयल कमिशन ऑन पॉप्युलेशनचा इंग्लंडच्या लोकसंख्येविषयींचा अहवालसुद्धां बहिष्कृत करण्यांत आला आहे ! कारण या अहवालांत वाढत्या लोकसंख्येवर संततिनियमन हा उपाय सुचविला आहे ! ! एच्. इ. बेटस्, पर्ल बक, अर्स्किन काल्डवेल, जॉइस केरी, थिओडर डीसर, डाफ्ने द मॉरियर, विल्यम फॉकनर, सी. एस्. फॉरेस्टर, अर्नेस्ट हेमिंग्वे, ख्रिस्तोफर इशरवूड, निऑमी जेकब्स, ऑर्थर कोएस्लर, सिंक्लेअर लुइस, ॲन्गस विल्सन इत्यादि अनेक प्रथितयश साहित्यिकांच्या साहित्यावर बंदी घालण्यांत आली आहे. आयर्लंडच्या पार्ल-मेंटच्या किंग्जमिल मूर या सभासदानें ही यादी पाहून असे उद्गार काढले कीं, "आधुनिक अभिजात वाङ्मयाची यादी एखाद्याला पाहिजे असेल तर त्यानें ही यादी पाहावी !" Everymans' guide to the modern Classics.

## आयर्लंडसाठीं वेगळी आवृत्ति

सध्यां बोर्डाचे सर्व सभासद रोमन कॅथॉलिक आहेत. अध्यक्ष धर्मोपदेशक आहे, आणि बाकीच्या सभासदांत दोन प्राध्यापक, एक जिल्हान्यायाधीश व एक व्यापारी आहे. दर महिन्याला सरासरी पन्नास पुस्तकें त्यांच्याकडे पाठविलीं

जातात, आणि त्यांपैकीं जवळ जवळ २-३ पुस्तकांवर बंदी घालण्यांत येते! बोर्डाची महिन्यांतून एकदां बैठक होते, आणि कोणत्या कारणासाठीं बंदी घालण्यांत आली आहे हें कधींच सांगितलें जात नाहीं! लेखक अथवा प्रकाशक यांना बोलावून त्यांच्याशीं चर्चा करण्याचा हक्क बोर्डाला आहे. परंतु आजपर्यंत एकाहि लेखकाला किंवा प्रकाशकाला बोर्डानें बोलाविलेलें नाहीं!! बोर्डाच्या या कार्यपद्धतीमुळें कित्येक इंग्रजी साप्ताहिकें आयर्लंडसाठीं वेगळी आवृत्ति काढतात!

१९३७ या बोर्डाचे एक प्रॉटेस्टंट सभासद लिन डॉयल यांनीं बोर्डाच्या कार्यपद्धतीविरुद्ध निषेध म्हणून राजीनामा दिला. या कार्यपद्धतीवर टीका करतांना त्यांनीं सांगितलें कीं, आपले इतर व्यवसाय संभाळून महिना पन्नास पुस्तकें वाचणें सभासदांना अशक्य होतें. बोर्डाचा मुख्य अधिकारी सर्व पुस्तकांतील निवडक पानांवर खुणा करून पाठवतो. तेवढाच भाग वाचून पुस्तकाबद्दल निर्णय घेण्याचा मोह होतो, आणि सबंध पुस्तक वाचून काढलें तरी निवडक उताऱ्याचा ठसा मनावर कायम राहतो. १९४९ सालीं डॉ. स्मिथ या दुसऱ्या प्रॉटेस्टंट सभासदानेंहि राजीनामा दिला. कारण त्यांनाहि तोच अनुभव आला. त्यांनीं सांगितलें कीं, कित्येक वेळां शेंकडों पानांच्या पुस्तकांवर कांहीं तासांच्या आंत निर्णय कळवावा असें सुचविलें जाई, तर कांहीं पुस्तकें बैठक चालू असतांनाच आणून दिलीं जात व न वाचतांच निर्णय घेतला जाई!! या कार्यपद्धतीमुळें कॅथॉलिक चर्चनें मान्यता दिली असूनहि लॉज ऑफ लाइफ हा ग्रंथ बहिष्कृत करण्यांत आला, आणि समलिंगी आकर्षणाबद्दल सबंध कादंबरींत फक्त एकच शब्द होता, तरीसुद्धां केट ओब्रायनच्या 'लँड ऑफ स्पाइस'वर बंदी घालण्यांत आली!! सरकारी सेन्सॉर बोर्डाची ही स्थिति, तर मग स्थानिक संस्थांच्या बिनसरकारी वाचनालयांचें काय धोरण असेल याची कल्पनाच करवत नाहीं! उदाहरणार्थ, डब्लिन कौंटी लायब्ररीनें तर क्रोशेचा युरोपचा इतिहास बहिष्कृत ठरविला आहे!

## कॅथॉलिक धर्माचा पगडा

आयर्लंडमधील या वातावरणांत बुद्धिवादी लोक आणि साहित्यिक यांचा उपहास करणें ही एक फॅशन झाली आहे. याचें एक कारण म्हणजे तेथील

जनतेवर असलेला कॅथॉलिक धर्माचा पगडा. १५६४ च्या कौन्सिल ऑफ ट्रेन्टपासून पुस्तकावर बंदी घालण्याचें धोरण खिश्चन धर्मानें स्वीकारलें व बंदी घालण्यांत आलेलीं पुस्तकें कॅथॉलिक लोकांनीं वाचूं नयेत असा आदेश चर्चतर्फे देण्यांत येतो. अशा पुस्तकांची यादी त्या वेळेपासून पोपतर्फे जाहीर करण्यांत येते. १५२० मध्यें पोप दहावा लिओ यानें तर मार्टिन ल्यूथरच्या पुढें प्रसिद्ध होणाऱ्यासुद्धां सर्व पुस्तकांवर बंदी घातली! या यादीला रोमन इंडेक्स असें म्हणतात.

वाङ्मयासंबंधीं कांहीं नियमहि कॅथॉलिक चर्चनें केले आहेत. उदाहरणार्थ, पुढील नियम ( Canons ) पहा:—नियम १३९९ प्रमाणें घटस्फोटाचा पुरस्कार करणारें लिखाण आणि अश्लील लिखाण यांवर बंदी घालण्यांत आली आहे. कोणीहि कॅथॉलिक पुस्तकविक्रेत्यानें अशीं पुस्तकें आपल्या दुकानांत ठेवूं नयेत (नियम १३९८ व १४०४); परंतु बिशपच्या परवानगीनें अशीं पुस्तकें वाचतां येतील ( १४०२ ). या नियमांचा भंग करणाऱ्यास वाळींत टाकावें ( २३१८ ). मात्र हे नियम कार्डिनल बिशप यांना लागू नाहींत! ( १४०१ ).

## आक्षेपार्ह पुस्तकें व ग्रंथकार

१९४८ च्या रोमन इंडेक्सप्रमाणें खालील लेखकांचीं कांहीं पुस्तकें आक्षेपार्ह ठरविण्यांत आलीं आहेत:—बाल्झाक, डन नाझिओ, डयूमा, अनातोल फ्रान्स, ऑलिव्हर गोल्डस्मिथ, कॅसानोव्हा, डेस्कार्टीस, गिब्रन, व्हिक्टर ह्यूगो, डेव्हिड ह्यूम, जे. एस्. मिल, पास्कल, रेना, रिचर्डसन, स्टेंडाल, व्हॉल्टेर आणि रूसो. ही झाली कॅथॉलिक चर्चची यादी. परंतु कायद्यानेंहि बहुतेक देशांत कांहीं ना कांहीं पुस्तकांवर बंदी घालण्यांत आलेली आढळते. उदाहरणार्थ, इंग्लंडमध्यें बोकॅक्शिओ–डिकॅमेनॉन १९५४, चार्लस–सेक्शुअल इंपल्स १९३४, कोनेल–सप्टेंबर इन किनझ १९५४, डी मॉटाल्क–कविता १९३२, हॅवलॉक एलिस–सेक्शुअल इनव्हर्शन १८९८, रॅडक्लिफ हॉल–वेल्स् ऑफ लोनलिनेस १९२८, हॅनले–बॉय १९३५, नोरा जेम्स–स्लिवलेस एरंड १९२९, जेम्स जॉईस–युलिसिस् १९२३, डी. एच्. लॉरेन्स–रेनबो १९१५, ओव्हिड एलिजिस १५९९, पेट्रोनियस सेटीरिकॉन १९३४,

स्मिथ–बेसी कॉटर १९३३, आणि झोला–लातेर १८८८. अमेरिकेंत–कॉल्डवेल–गॉडस् लिटल एकर १९५०, थिओडर ड्रिसर–अमेरिकन ट्रॅजेडी १९३०, हक्स्ले–अँटीक हे–१९३०, हेरी मिलर–ट्रॉपिक ऑफ कॅन्सर आणि ट्रॉपिक ऑफ कॅप्रिकॉर्न १९५३, जॉर्ज मूर–स्टोरी टेलर्स हॉलिडे १९२९, स्मिथ–स्ट्रेन्ज फ्रूट १९४४ आणि विल्सन–मेमॉयर्स ऑफ हिकेट कौंटी १९४६. फ्रान्समध्यें–राबेलस पॅन्टग्रुएल १५५३, आणि सेड-जस्टीनें व ज्युलिएट १७९१ व १७९८. साउथ आफ्रिकेंत-रॅबेलसचें सर्व लिखाण १९३८, आणि किन्सेचें सेक्शुअल बिहेवियर इन द् ह्यूमन फीमेल १९५३, आणि जपानमध्यें–डी. एच्. लॉरेन्सची लेडी चॅटर्लीज लव्हर १९५२.

## ऑस्ट्रेलियाचा कायदा

जगांतील बहुतेक राष्ट्रांत अश्लीलतेसंबंधीं कायदा आहे. सर्वांचा तपशील-वार आढावा घेणें अशक्य आहे. सर्वसामान्यतः राष्ट्रकुलांतील राष्ट्रांतील कायदा इंग्लंडच्या धर्तीवर आहे. परंतु प्रत्येक राष्ट्राचीं कांहीं वैशिष्ट्यें आहेत; आणि कायद्याची अंमलबजावणीहि समान नाहीं. ऑस्ट्रेलियांत इंग्लंडच्या मानानें कमी खटले भरले जातात. जास्तींत जास्त शिक्षा दोन वर्षें तुरुंग-वास आणि शंभर पौंड दंड अशी आहे. शास्त्रीय लिखाण आणि खरेखुरे वाङ्मयीन किंवा कलात्मक गुण असलेलें लिखाण या कायद्यांतून वगळलेलें आहे. ब्रेमेर वि. वॉकर (१८८५) या खटल्यांत आरोपीनें ब्राडलॉ व ॲनी बेझंट यांच्या विचारसरणीला पाठिंबा देण्यासाठीं एक व्याख्यान दिलें, आणि विषय समजावून सांगण्यासाठीं कांहीं चित्रें दाखविलीं. चित्रें अश्लील असलीं तरी शास्त्रीय गोष्टींसाठीं त्यांचा वापर केला असल्यामुळें तीं अश्लील ठरत नाहींत असा निर्णय न्यू साउथ वेल्सच्या न्यायालयानें दिला.

## टाइपावरील बंधनें

१८८८ सालच्या एका खटल्यांत ॲनी बेझंटचें लॉज ऑफ पॉप्युलेशन हें पुस्तक प्रसिद्ध केलें, असा आरोप होता. परंतु न्यायालयानें आरोपीला निर्दोषी ठरविलें. थॉमसन वि. स्टोरर (१९३३) या खटल्यांत सिडने विद्यापीठांतील वैद्यकशास्त्राचे प्राध्यापक व दोन धर्मोपदेशक यांना आरोपी-

तर्फे साक्ष देण्यास परवानगी देण्यांत आली. मात्र युद्धकाळांतील टोब्रुक येथील सैनिकांच्या जीवनावरील आधारलेली लॉवसन ग्लासम नांवाच्या लेखकाची 'वुई वेअर रॅटस्' ही कादंबरी १९४६ च्या बॉइड वि. ॲन्गास या खटल्यांत अश्लील ठरली. साउथ ऑस्ट्रेलियांत तर मुद्रकांनीं कोणते टाइप वापरावे यावरसुद्धां बंधनें आहेत! तेथील १९३६ च्या पोलिस ॲक्टाप्रमाणें स्त्रीपुरुषसंबंधींच्या बातम्या देतांना वृत्तपत्रांना खालील बंधनें पाळावीं लागतात. कोणत्याहि एका बातमींत १३ सीएम च्या पन्नासपेक्षां जास्त ओळी असतां कामा नयेत, आणि मथळ्यांत दहा पॉइंटपेक्षां मोठा कॅपिटल अक्षराचा टाइप असतां कामा नये! कॅनडांतील कायदा इंग्लिश पद्धतींचाच आहे. एका मोठ्या पुस्तकाविक्रेत्यावर त्याच्या नोकरानें अश्लील पुस्तक विकल्याबद्दलच्या खटल्यांत कॅनडांतील न्यायालयानें विक्रेत्याला निर्दोषी ठरविलें (रेक्स वि. बिरेल १९१२). १९४४ च्या कॉनवे वि. रेक्स या खटल्याची हकीकत अशी:—आरोपीनें एका नाटयगृहांत एक कार्यक्रम सादर केला होता आणि त्यांत कांहीं अर्धनग्न स्त्रिया पुतळ्यासारख्या उभ्या केल्या होत्या. न्यायालयानें हा कार्यक्रम अश्लील नव्हता असा निर्णय दिला. उलट त्या अगोदरच्या १९१३ सालच्या रेक्स वि. सेंट क्लेअर या खटल्यांतील आरोपीनें कांहीं नाटकांतील अश्लील वर्णनें धर्मोपदेशकांत प्रसृत केल्याबद्दल त्याला दोषी ठरविण्यांत आलें. न्यूझीलंडमध्यें १९१७ सालीं जॉर्जियॉनच्या स्लिपिंग ब्यूटीच्या फोटोचें प्रदर्शन न्यायालयांनीं अश्लील ठरविलें (क्राकर्सन वि. मॅकार्थी). १९३२ सालीं वॉल्श वि. स्टेथमोर या खटल्यांत न्यायाधीशांनीं असा निर्णय दिला कीं, इंग्रजींतील 'ब्लडी' हा शब्द अश्लील नाहीं. परंतु 'बगर' हा शब्द अश्लील आहे! १९३९ सालीं एका खटल्यांत आरोपीचा बुकक्लब डिकॅमेरॉन हें पुस्तक सहा पेनीला विकत आहे असा आरोप होता. परंतु त्याची जाहिरात केली नसल्यामुळें आरोपीला सोडून देण्यांत आलें (सुंप्टर वि. स्टीवनसन).

## खटले भरण्याची मुदत

जगांतील बहुतेक राष्ट्रांत असे खटले गुन्हा केल्यापासून ठराविक मुदतींतच भरावे लागतात. बेल्जम—(तीन वर्षें), डेन्मार्क (दोन), फ्रान्स (तीन) आणि स्वीडन व ग्रीस (सहा महिने). बहुतेक देशांत सरकारलाच खटला

भरतां येतो, खाजगी फिर्याद करतां येत नाहीं. येवढेंच नव्हे तर खटला भरण्यापूर्वी न्यूझीलंड व डेन्मार्क या देशांत सरकारला ॲटर्नी जनरलची संमति घ्यावी लागते. बहुतेक देशांत कायद्याचें अज्ञान ही सबब होऊं शकत नाहीं, आणि मुद्दाम बुद्धया (intention) अश्लील लिखाण केलें आहे किंवा नाहीं याचा विचार करण्यांत येत नाहीं. मात्र वाङ्मयीन आणि कलात्मक गुण लक्षांत घेतले जातात. पोस्ट आणि कस्टम खात्याला अश्लील लिखाण जप्त करण्याचा अधिकार सर्वत्र दिलेला दिसतो. ग्रीसमध्यें मात्र तसा या खात्यांना खास अधिकार नाहीं. बहुतेक देशांत पहिल्या गुन्ह्याला कमी शिक्षा आहे. परंतु पुन्हा हा गुन्हा केला तर त्या प्रमाणांत शिक्षा वाढत जाते. बेल्जम, हिंदुस्थान व फ्रान्समध्यें तरुणांच्यांत असें लिखाण प्रसृत केल्यास दुप्पट शिक्षा देण्यांत येते. स्वीडनमध्यें प्रत्येक लेखकाला आपलें नांव न जाहीर करतां निनांवी अगर टोपण नांवानें लिखाण करण्याचा हक्क आहे. आणि हा हक्क लेखकानें बजाविला असल्यास त्या लिखाणाबद्दल फौजदारी खटला भरतां येत नाहीं ! रशियांत अश्लील लिखाणाबद्दल १९३५ पर्यंत कांहींहि कायदा नव्हता. त्यानंतर मात्र अशा लिखाणास पांच वर्षांची शिक्षा आहे. परंतु बहुतेक सर्व लिखाण सरकार व ट्रेड युनियनसारख्या संस्था यांच्यामार्फत प्रसिद्ध होत असल्यामुळें तेथें अश्लील लिखाण आढळत नाहीं, आणि त्या-बद्दलच्या खटल्याच्या हकीकतीहि उपलब्ध नाहींत.

* * *

## ६ : हिंदुस्थानांतील अश्लीलताविरोधी कायदे

हिंदुस्थानांत अश्लीलतेसंबंधीं एकूण सात कायदे आहेत. १८८८ सालीं हिंदुस्थान सरकारनें पोस्ट ऑफिस अॅक्ट पास केला. या कायद्याच्या २० ते २३ कलमांन्वयें अश्लील लिखाण पाठविण्यास बंदी आहे, व या कायद्याचा भंग केल्यास जास्तींत जास्त एक वर्ष तुरुंगवास व दंड अशी शिक्षा आहे. पौरुष वाढविणाऱ्या एका औषधाची जाहिरात पोस्ट-कार्डावर छापून पाठविल्या-बद्दल कलकत्ता हायकोर्टानें शरद्चंद्र घोष ( १९०१ ) या खटल्यांत आरोपीस शिक्षा केली. पीडाग्रस्तांना मदत करण्याच्या उद्देशानें ती जाहिरात केली हा आरोपीचा बचाव न्यायालयानें अमान्य केला, कारण औषध वृद्धांनासुद्धां गुणकारी वाटेल अशीं वाक्यें जाहिरातींत होतीं.

### नाट्यप्रयोग परवाना कायदा

यापूर्वी १८७६ सालीं ड्रॅमॅटिक परफॉर्मन्स अॅक्ट पास करण्यांत आला होता. या कायद्यान्वयें अश्लील नाटक किंवा तत्सम जाहीर कार्यक्रमांना बंदी घालण्याचा अधिकार सरकारला देण्यांत आला आहे. ज्या भागांत हा कायदा लागू आहे, त्या ठिकाणीं असे कार्यक्रम करण्यासाठीं परवाना घ्यावा लागतो. अशा कार्यक्रमांविषयीं सर्व माहिती सरकार मागूं शकतें, व या कायद्याचा भंग केल्यास जास्तींत जास्त तीन महिने कारावास व दंड अशी शिक्षा आहे. या कायद्यान्वयें किती खटले भरले याची माहिती उपलब्ध नाहीं. निदान ते खटले हायकोर्टापर्यंत तरी आलेले दिसत नाहींत.

त्यानंतर दोन वर्षांनीं म्हणजे १८७८ मध्यें सी कस्टम्स ॲक्ट पास करण्यांत आला. या कायद्याच्या १८ व्या कलमान्वयें परदेशांतून अश्लील लिखाण आयात करण्यास बंदी आहे. कस्टम अधिकारी असें लिखाण जप्त करूं शकतात. आणि कायद्याचा भंग केल्यास जप्त सामानाच्या तिप्पट किंवा एक हजार रुपये दंडाची शिक्षा आहे.

## वृत्तपत्रनियंत्रण

१९१८ च्या सिनेमॅटोग्राफ ॲक्टमध्यें १९५२ सालीं बदल करण्यांत आला, व सेन्सॉर बोर्डास चित्रपटांतील अश्लील भाग काढून टाकण्यास सांगण्याचा अधिकार देण्यांत आलेला आहे. स्वातंत्र्यानंतर आणखी दोन कायदे पास झाले. १९५१ सालीं प्रेस ऑब्जेक्शनेबल मॅटर ॲक्ट पास झाला. या कायद्याच्या कलम ३ प्रमाणें अश्लील लिखाण प्रसिद्ध केल्यास सरकार सेशन न्यायालयाकडे फिर्याद करूं शकतें. न्यायालयास योग्य वाटल्यास न्यायालय त्या वृत्तपत्राच्या मुद्रक, प्रकाशक किंवा संपादकाकडून अनामत रक्कम ( security ) मागूं शकतें. ही रक्कम पंधरा दिवसांत भरावी लागते किंवा न्यायालय आरोपीस समज देऊन सोडून देऊं शकतें. पुन्हां पुन्हां गुन्हा घडल्यास ही रक्कम जप्त करावी अशी शिक्षा न्यायालय देऊं शकतें. रक्कम न भरल्यास सरकार छापखाना जप्त करूं शकतें, आणि याउपर कायद्याचा भंग झाला तर आरोपीस सहा महिने कारावास किंवा दोन हजार रु. दंड अशी शिक्षा न्यायालय देऊं शकतें. याशिवाय छापखान्याचें व वृत्तपत्रांचें रजिस्ट्रेशन रद्द करण्यांत येतें. या कायद्याचा भंग केल्याबद्दल होणारा खटला ज्यूरीतर्फे चालावा अशी मागणी करण्याचा हक्क आरोपीस दिलेला आहे. ही ज्यूरी पांच जणांची असेल, आणि हे पांचहि ज्यूरींतील असामी वृत्तपत्र आणि मुद्रण-व्यवसायांतले असले पाहिजेत. ज्यूरींचा निर्णय न्यायाधीशावर बंधनकारक नाहीं; आणि न्यायाधीशाला तो मान्य नसेल तर तो सर्व प्रकरण हायकोर्टाकडे पाठवूं शकतो. वृत्तपत्राचे पूर्वीचे आणि नंतरचे अंकांतील लिखाण पुरावा म्हणून दाखल करण्याचा हक्कहि आरोपीस देण्यांत आलेला आहे. याहि कायद्यासंबंधीं हायकोर्टाचे महत्त्वाचे असे निकाल उपलब्ध नाहींत, त्या अर्थी क्वचितच खटले भरले जात असावेत.

## आय्. पी. सी. चीं कलमें

१९५४ सालीं मध्यवर्ती सरकारनें ड्रग्ज आणि मॅजिक रेमिडीज अॅक्ट हा दुसरा एक कायदा पास केला आहे. या कायद्यान्वयें लैंगिकविषयक औषधांच्या जाहिराती प्रसिद्ध करण्यास बंदी आहे. या कायद्याचा भंग झाल्यास पहिल्या गुन्ह्यास सहा महिने व नंतरच्या गुन्ह्यास एक वर्ष कारावास व दंड अशी शिक्षा आहे. याशिवाय अशीं सर्व कागदपत्रें व जाहिराती जप्त करण्याचा हक्क सरकारला आहे. अर्थातच हा कायदा शास्त्रीय व सामाजिक दृष्टीनें प्रसिद्ध केलेल्या जाहिरातींना लागू नाहीं. परंतु अश्लीलतेसंबंधीं हिंदुस्थानांतील सर्वांत महत्त्वाचा कायदा म्हणजे इंडियन पिनल कोडाचीं २९२ ते २९४ हीं कलमें.

१२ सप्टेंबर १९२३ सालीं हिंदुस्थाननें आन्तरराष्ट्रीय अश्लीलताविरोधी करारावर सही केली. करारानुसार १९२५ सालीं हिंदुस्थान सरकारनें एक कायदा करून २९२ व २९३ हीं कलमें इंडियन पिनल कोडांत घातलीं. या कलमांन्वयें अश्लील वाङ्मय, लिखाण, पुस्तिका, चित्रें, आकृति इत्यादि वाटणें, विकणें, प्रदर्शित करणें, भाड्यानें देणें, अगर अन्य मार्गानें प्रसृत करणें किंवा अशा वस्तु तयार करणें, जवळ बाळगणें, त्यांची आयात-निर्यात करणें किंवा अन्य मार्गांनीं अशा वस्तूंचा व्यापार करणें अगर जाहिरात करणें हा गुन्हा आहे व त्याला तीन महिने कारावास व दंड अशी शिक्षा आहे. या कलमाला एक अपवाद आहे.धार्मिक उद्देशासाठीं अशा वस्तु तयार केल्या असल्या तर त्यांना हें कलम लागू नाहीं. हाच गुन्हा वीस वर्षांच्या आंतील मनुष्यासंबंधीं असेल तर याच गुन्ह्याला सहा महिने तुरुंगवासाची शिक्षा आहे. उदाहरणार्थ, वीस वर्षांच्या आंतील मनुष्याला असें वाङ्मय विकणें, २९४ कलमान्वयें सार्वजनिक ठिकाणीं अश्लील कृत्य करणें, अश्लील भाषा वापरणें व गाणीं म्हणणें हा गुन्हा आहे, व त्यास तीन महिने तुरुंगवास व दंड अशी शिक्षा आहे. क्रिमिनल प्रोसिजर कोडाच्या ५२१ कलमान्वयें अशा वस्तु नष्ट करण्यास सांगण्याचा अधिकार न्यायालयाला देण्यांत आलेला आहे. याशिवाय कायद्यानें या गुन्ह्याला किती महत्त्व दिलें आहे हें आणखी दोन गोष्टींवरून दिसून येतें. अशा गुन्ह्यांबद्दल आरोपीस

वॉरंटशिवाय पकडण्याचा अधिकार पोलिसांना आहे. आणि ह्या गुन्ह्याचा खटला तडजोड करून मिटवितां येत नाहीं. तसेंच पहिल्या कलमान्वयें भरण्यांत आलेला खटला फर्स्टक्लास मॅजिस्ट्रेटपुढेंच चालूं शकतो.

## हायकोर्टाचा निकाल

या तीन कलमांन्वयें अनेक खटले आजपर्यंत भरण्यांत आलेले आहेत. निरनिराळ्या हायकोर्टांनीं या कलमांचा अन्वयार्थ लावलेला आहे. त्यांपैकीं कांहीं निवडक निकालांचा येथें विचार केला आहेः—

अश्लीलतेबद्दलचा मुंबई हायकोर्टाचा पहिला निकाल १८६७ च्या गणु गुरवाच्या खटल्यांतला असावा. (४ बॉंबे हायकोर्ट रिपोर्ट्स पृष्ठ २५) हा खटला रत्नागिरी जिल्ह्यांतील होता. आरोपी गणु गुरव हा लहान मुलांना स्त्रियांचे वेष देऊन त्यांच्यासह अश्लील लावण्या म्हणतो अशी फिर्याद जोशी नांवाच्या गृहस्थानें गुदरली होती. कनिष्ठ न्यायालयानें आरोपीस ५ रुपये दंड केला, परंतु हायकोर्टानें त्याला निर्दोषी ठरविलें. सरन्यायाधीश कौच आणि न्या. मू. न्यूटन यांनीं निकालपत्रांत १८६२ सालीं प्रसिद्ध झालेल्या रावसाहेब भास्कर दामोदर यांच्या मराठी कविता-संग्रहाचा आधार घेऊन निर्णय दिला कीं, प्रत्येक लावणी अश्लील असतेच असें गृहीत धरून चालणार नाहीं.

१८९५ सालच्या परशुराम यशवंत (२० बॉम्बे पृष्ठ १९३) या निकालांत हायकोर्टानें इंग्लंडच्या न्यायालयांनीं मान्य केलेली अश्लीलतेची हिकलीन कसोटी स्वीकारली आणि ती हिंदुस्थानांतहि लागू पडते असा निर्णय दिला. या खटल्यांतील आरोपीनें अर्धनग्न स्त्रियांचीं चित्रें विकलीं असा आरोप होता. पुण्याच्या मॅजिस्ट्रेटनें आरोपीस १० रुपये दंड केला. कस्टम खात्यानें या चित्राविरुद्ध कांहींहि उपाययोजना केलेली नव्हती, त्या अर्थीं तीं आक्षेपार्ह नसावीं, आणि अर्धनग्न स्त्रीचें चित्र अश्लील असतेंच असें नाहीं असा निर्णय न्या. मू. जार्डीन व न्या. मू. रानडे यांनीं दिला. या खटल्यांतील एक आश्चर्य म्हणजे हायकोर्टांत सरकार आणि आरोपी दोघांनींहि वकील दिलेला नव्हता !

## मुद्रकाची जबाबदारी

१९०५ सालीं हरिसिंग नांवाच्या एका आर्यसमाजी गृहस्थानें ‘ इत्र

कोरानी ’ नांवाचें उर्दू चोपडें प्रसिद्ध केल्याबद्दल खटला भरण्यांत आला होता. या चोपड्यांत कुराणांतील व्हर्जीन–मेरीबद्दलचे कांहीं उतारे देऊन त्यावर लेखकानें अश्लील भाष्य केलें होतें. धार्मिक प्रश्नावरचें हें एक चोपडें आहे आणि फार तर त्यांत मुसलमान धर्माची टिंगल केली आहे, हा आरोपीचा बचाव अलाहाबाद हायकोर्टानें अमान्य केला. कोणत्या हेतूनें अगर उद्देशानें हें चोपडें लिहिलें आहे, याचा विचार करण्याचें प्रयोजन नाहीं असें मत प्रदर्शित करून विशेषतः हें चोपडें विद्यार्थ्यांच्यांत वांटलें असल्यामुळें हायकोर्टानें शिक्षा कायम केली ( २ क्रिमिनल लॉ जर्नल ५२० ). त्याच वर्षीच्या मुमताज अली ( २ क्रि. लॉ. ज. ७१७ ) या खटल्यांत एक अश्लील उतारा आरोपीच्या अपरोक्ष त्याच्या नोकरानें छापला असल्यामुळें मुद्रकाला लाहोर हायकोर्टानें सोडून दिलें. या कलमाखालीं वृत्तपत्राच्या प्रकाशक किंवा मुद्रकाला शिक्षा करण्यापूर्वी त्याच्या आदेशानुसार किंवा त्याच्या हलगर्जीपणामुळें अश्लील लिखाण प्रसिद्ध झालें हें फिर्यादीनें सिद्ध केलें पाहिजे असा महत्त्वाचा निर्णय हायकोर्टानें दिला.

## साहित्यदृष्ट्या महत्त्वपूर्ण

खिरोदचंदर रॉय चौधरी ( १३ क्रि. लॉ. ज. १७७ ) या खटल्यांतील कलकत्ता हायकोर्टाचे न्या.मू.चतर्जी यांचें निकालपत्र हिंदुस्थानांतील कायद्याच्या आणि साहित्याच्या दृष्टीनें फार महत्त्वाचें आहे. या खटल्यांतील आरोपीनें उडीया भाषेंतील राधाकृष्णांच्या लीलांचें वर्णन करणारें दिनसुंदरी नांवाच्या एका कवयित्रीचें काव्य प्रसिद्ध केलें होतें. हरिवंशांतील कांहीं भागाचा आधार घेऊन हें काव्य शंभर वर्षांपूर्वीच प्रसिद्ध झालेलें होतें, आणि त्याच्या अनेक आवृत्त्या निघाल्या होत्या. कलकत्ता गॅझेटमध्यें पौराणिक साहित्य म्हणून तें रजिस्टरहि करण्यांत आलें होतें. परंतु “ राधेनें आपलें वस्त्र दूर केलें आणि तिच्या अनावृत वक्षस्थळाला कृष्णानें स्पर्श केला ” अशा अर्थाच्या पंक्ति अश्लील आहेत असें ठरवून मॅजिस्ट्रेटनें आरोपीस दंड केला. या सर्व वर्णनांत ‘ रति ’ या शब्दाचा उल्लेख आहे म्हणूनहि तें अश्लील आहे, असा निर्णय मॅजिस्ट्रेटनें दिला. सरकारतर्फे वकील, कारकून, स्कूल इन्स्पेक्टर अशा व्यवसायांतील पांच हिंदु, एक मुसलमान व एक ख्रिश्चन साक्षीदारांनीं साक्ष दिली, आणि काव्य अश्लील असल्याचें सांगितलें. हाय-

कोर्टानें हा पुरावा सर्व बाजूस सारून आरोपीला निर्दोषी ठरविलें.आरोपीतर्फे रघुवंश, गीतगोविंद, बायबल इत्यादि पुस्तकांतील तशाच अर्थाचे उतारे सादर करण्यांत आले होते, त्याचा उल्लेख करून हायकोर्टानें म्हटलें कीं, बायबलमध्यें बापलेकीच्या अनैतिक संबंधाचा एक उल्लेख आहे म्हणून बायबल अश्लील ठरत नाहीं, त्याचप्रमाणें राधाकृष्णाच्या लीलांचें वर्णन करणाऱ्या या काव्याचा खरा अर्थ आध्यात्मिक असल्यामुळें तें अश्लील ठरत नाहीं. राधा ही परस्त्री असली तरी राधाकृष्णाच्या संबंधाकडे हिंदु मन त्या दृष्टीनें पाहात नसल्यामुळें तें काव्य वाचून वाचकांच्या मनावर वाईट परिणाम होणार नाहीं हा मुद्दाहि हायकोर्टानें मान्य केला.

## शास्त्रीय माहिती

यानंतरच्या टाकरदत्त ( १८ क्रि. लॉ. ज. १२६ ) या खटल्यांत शास्त्रीय स्वरूपाची माहिती अश्लील ठरत नाहीं असा निर्णय देऊन पंजाब हायकोर्टानें आरोपीला निर्दोषी ठरविलें. यांतील आरोपीनें 'देशउपकारक' या आपल्या वृत्तपत्रांत लैंगिक विकार व त्यावरील उपचार यांची माहिती दिली होती. अशाच स्वरूपाचें लिखाण वैद्यकीय व्यवसायाच्या मासिकांतून येत असल्यामुळें तें अश्लील ठरूं शकत नाहीं, हा मुद्दा न्यायालयानें मान्य केला. अर्थात् कोणत्या उद्देशानें हें लिखाण प्रसिद्ध झालें याचा विचार करतां येत नाहीं, आणि सद्हेतूनें केलेलें लिखाणसुद्धां अश्लील ठरण्याचा संभव आहे असें निकालपत्रांत म्हटलें आहे. तसेंच केवळ वर्गणीदार थोडे अगर मर्यादित आहेत या मुद्द्यावर आरोपी सुटूं शकत नाहीं असेंहि मत निकालपत्रांत व्यक्त केलें आहे.

लेखकाचा उद्देश किंवा हेतु कायद्याच्या दृष्टीनें असंबद्ध आहे असाच निर्णय मद्रास हायकोर्टानेंहि मंत्री प्रगदाच्या खटल्यांत ( १७ क्रि. लॉ. ज. १५३ ) १९१६ सालीं दिला. पंधराव्या शतकांतील तेलगू भाषेंतील एक अभिजात लेखक श्रीनंद यांचें 'विदीनाटकम्' नांवाचें काव्य आरोपीनें प्रसिद्ध केलें असा त्यांच्यावर आरोप होता. या काव्याच्या अनेक आवृत्त्या निघाल्या होत्या. जुन्या तेलगू शैलींत तें लिहिलें असल्यामुळें सामान्य लोकांना तें समजणार नाहीं, आणि वाङ्मयीन दृष्ट्या या काव्यांत अनेक गुण

आहेत, या सर्व गोष्टी लक्षांत घेऊन मॅजिस्ट्रेटनें आरोपीला सोडून दिलें होतें. हायकोर्टांत मात्र त्याला शिक्षा झाली, आणि त्यासाठीं हायकोर्टानें खालील कारणें दिलीं:—( १ ) पंधराव्या शतकांत मुद्रणकला अस्तित्वांत नव्हती, म्हणून त्या वेळच्या परिस्थितीचा विचार करून चालणार नाहीं. ( २ ) पुस्तकाची किंमत फक्त एक आणा ठेवली असल्यामुळें लहान मुलांमुलींच्या हातांत तें जाणें शक्य आहे. ( ३ ) आरोपीनें तें कोणत्या उद्देशानें प्रसिद्ध केलें याचा विचार करण्याचें कारण नाहीं. ( ४ ) या काव्यांतील नायक एका विवाहित स्त्रीशीं संबंध ठेवतो असें दाखविलें आहे. ( ५ ) विवाहित स्त्रीच्या वक्षस्थळासंबंधीं केलेलें वर्णन, ‘ मदनाचें गुप्त स्थळ ’, ‘ दीर्घ दंड ’ इत्यादि शब्दसमूह अशा संदर्भात वापरले आहेत कीं त्यांचा एकच अर्थ म्हणजे अश्लील अर्थ होतो.

याच वर्षीं गुलामहुसेन ( १८ क्रि. लॉ. ज. ५०५ ) या खटल्यांत रमझानच्या वेळीं कोणत्या गोष्टी पाळल्या पाहिजेत हें सांगण्यासाठीं आरोपीनें निरनिराळ्या धार्मिक ग्रंथांतील लैंगिक जीवनासंबंधींचे उतारे एकत्र करून छापले होते. परंतु हें सर्व लिखाण धार्मिक स्वरूपाचें असल्यामुळें इंडियन पिनल कोडाचें २९२ कलम लागू पडत नाहीं असा निर्णय देऊन पंजाब हायकोर्टानें आरोपीस निर्दोषी ठरविलें. याच सुमारास विष्णु कृष्ण ( १५ बॉम्बे लॉ रिपोर्टर ३०७ ) या निर्णयांत मुंबई हायकोर्टानें धूतपापेश्वरनें प्रसिद्ध केलेलें ‘व्यवहार–वैद्यक’ नांवाचें पुस्तक तें वैद्यकीय माहिती देणारें असल्यामुळें अश्लील नाहीं असें मत व्यक्त केलें. “ अशा लिखाणाचा अर्थ पाहण्यापेक्षां तें कोणत्या भाषेंत आणि कशा पद्धतीनें व्यक्त केलें आहे हें महत्त्वाचें आहे. योग्य विचारदेखील अश्लील भाषेंत व्यक्त करतां येतो. परंतु ही कसोटी लावण्यापूर्वी मराठी भाषेचें स्वरूप, घडण आणि वेगळेपण न्यायालयांनीं लक्षांत घेतलें पाहिजे. मराठी भाषेंत लिहितांना स्वाभाविकतःच येणारा एक प्रकारचा स्पष्टपणा म्हणजे अश्लीलता नव्हे; लिखाण अश्लील असेल तरच त्याचा परिणाम वाईट होतो, स्पष्ट लिखाणाचा होत नाहीं, ” असें या निकालांत म्हटलें आहे. या खटल्यांत हायकोर्टानें डॉ. भाजेकर व कर्नल कीर्तिकर या तज्ज्ञ आणि अनुभवी डॉक्टरांच्या साक्षी महत्त्वाच्या मानल्या. यानंतरच्या मुंबई हायकोर्टाच्या रहीमतुल्ला ( २२ बॉ. लॉ.

रि. १६६ ) या खटल्यांत दोन न्यायाधीशांचें एकमत झालें नाहीं. दाऊदी बोहरा जमातींत दोन तट पडले होते. एका गटाचा पुरस्कार करतांना आरोपीनें "याझिदकी ईद' नांवाचें चोपडें प्रसिद्ध केलें होतें. या चोपड्यांत विरुद्ध गटांतील धर्मोपदेशकांची अश्लील टिंगल केली आहे, असें न्या. मू. हेवर्ड यांनीं मत दिलें. परंतु न्या. मू. शहा यांच्या मतें तें चोपडें अश्लील नव्हतें.

१९२८ सालीं 'काश्मीरच्या पंतप्रधानानें लिहिलेलें ८४ आसनांचें रंगीत पुस्तक' अशी जाहिरात प्रसिद्ध केल्याबद्दल 'महावीर' या साप्ताहिकाचे संपादक जगत्नारायण यांच्यावर खटला भरण्यांत आला होता. पाटणा हायकोर्टानें ( ए. आयू. आर. १९२८ पाटणा ६४९ ) कनिष्ठ न्यायाधीशानें आरोपीला दिलेली शिक्षा रद्द केली. आसन याचा अर्थ योगासन होतो हा आरोपीचा बचाव मान्य करून हायकोर्टानें म्हटलें आहे कीं, "हिंदुतत्त्वज्ञानांतील षड्दर्शनांपैकीं पतंजलीचें योगदर्शन अनेक वर्षें मान्यता पावलेलें आहे. ८४ आंकड्यांत कांहीं तरी गूढ आहे अशी हिंदु लोकांची श्रद्धा आहे. पुस्तकांत दिलेलीं चित्रें अश्लील नाहींत, म्हणून २९२ कलमाप्रमाणें गुन्हा केला असें म्हणतां येणार नाहीं."

याउलट कैलासचंद्र (१९३२ कलकत्ता ६५१) या खटल्यांत आरोपीची शिक्षा कलकत्ता हायकोर्टानें कायम केली. 'रामसदार आत्मकथा' हें पुस्तक आरोपीनें प्रसिद्ध केलें होतें. त्यांत नायकाचे निरनिराळ्या स्त्रियांशीं कसेकसे संबंध येतात याचें वर्णन आहे. आरोपीचा बचाव असा होता कीं, ढोंगी बड्या माणसांचें जीवन कसें असतें आणि मोहाला मनुष्य बळी पडला कीं त्याचा नाश कसा होतो हें दाखविण्याच्या उद्देशानें पुस्तक लिहिलें आहे. परंतु हायकोर्टानें हा बचाव अमान्य केला; तर याच हायकोर्टानें १९४० सालीं नग्न स्त्रियांचीं चित्रें अश्लील असतातच असें नाहीं असा निर्णय देऊन आरोपीस सोडून दिलें ( श्री राम सक्सेना १९४० कलकत्ता २९० ). लाहोर हायकोर्टानें १९४७ सालीं धूतपापेश्वर खटल्यांतील तत्त्व स्वीकारून 'इदायतनामाखावंद' हें वैद्यकीय पुस्तक अश्लील नाहीं असें ठरविलें. या पुस्तकांत स्त्रीपुरुषांनीं लैंगिक जीवन कसें सुधारावें याबद्दल शास्त्रीय चर्चा केलेली आहे ( हरनामदास १९४७, लाहोर ३८३ ). १९५२ सालीं

सुकान्त हलदर ( १९५२, कलकत्ता १४ ) या खटल्यांत कलकत्ता हायकोर्टानें आरोपी चालवीत असलेलें 'नरनारी' नांवाचें बंगाली मासिक अश्लील ठरविलें. या मासिकांतील सर्वच लेख अश्लील आहेत असें हायकोर्टाचें मत पडलें. एका लेखांत हिंदुस्थानांतील प्राचीन देवळांतील शिल्पांचीं चित्रें देऊन त्यावर भाष्य केलेलें होतें. हीं चित्रें कलेच्या दृष्टीनें निवडलेलीं नव्हतीं, तर केवळ लैंगिक संबंध दाखविणारें शिल्पच निवडलें होतें. शिवाय एक कथा बलात्कारासंबंधीं होती; तर प्रश्नोत्तराच्या रकान्यांतील सर्वच प्रश्न लैंगिक होते. म्हणून हायकोर्टानें म्हटलें आहे कीं, या सर्व लिखाणांत संशोधन किंवा शास्त्रीय दृष्टि यांचा मागमूसहि नाहीं. आणि भाषा, विषय आणि चित्रें या सर्वांचा विचार करतां सर्वच लिखाण अश्लील आहे असें म्हटलें पाहिजे.

१९५३ सालचा मद्रास हायकोर्टाचा डी. पांडुरंगन् ( १९५३ मद्रास, ४१८ ) हा निर्णय या कायद्याच्या दृष्टीनें महत्त्वाचा आहे. हायकोर्टानें या खटल्यांत तीन गोष्टी ठरविल्या आहेतः—( १ ) तशाच स्वरूपाच्या इतर लिखाणावर सरकारनें खटला भरलेला नाहीं असा बचाव कायदेशीर ठरत नाहीं. ( २ ) पुस्तकावर आरोपीचें नांव आहे, आणि क्रिमिनल प्रोसीजर कोडाच्या ३४२ कलमान्वयें आरोपीनें केलेल्या निवेदनांत आपण छापखान्याचे मालक ( Keeper ) आहोंत असें म्हटलें आहे येवढ्या पुराव्यावरून त्या छापखान्यांतच तें छापलें आहे ही गोष्ट सिद्ध होत नाहीं. असें गृहीत कृत्य मुद्रक आणि प्रकाशक यांच्या बाबतींतच लागू होतें ! कारण प्रेस अॅण्ड रजिस्ट्रेशन ऑफ बुक्स अॅक्ट या कायद्याचें सातवें कलम येथें गैरलागू आहे आणि ( ३ ) १९५१ च्या प्रेस ऑब्जेक्शनेबल मॅटर अॅक्ट या कायद्यामुळें पिनल कोडच्या २९२ या कलमान्वयें भरलेल्या खटल्यांत कायद्याची हरकत किंवा बाध येत नाहीं. कारण दोन्ही गुन्हे स्वतंत्र आहेत,. आणि १९५१ च्या कायद्यान्वयें सरकारला अश्लील लिखाण फक्त जप्तच करतां येतें.

१९५४ सालीं म्हैसूर मेडिकल कॉलेजचे सेवानिवृत्त प्राध्यापक डॉ. पुटप्पा आणि देवदु नरसिंहशास्त्री हे कानडी लेखक या दोघांनीं आरोपीच्या वतीनें साक्षी दिल्या असूनहि 'कामकला' हें मासिक म्हैसूर हायकोर्टानें अश्लील ठरविलें ( १९५४ क्रि. लॉ. ज. १६२२ ). वाचकांवर परिणाम

काय होईल ही कसोटी लावतांना अतिशय सुसंस्कृत किंवा अपवादात्मक वाचकांचा विचार न करतां सर्वसामान्य वाचकाचा विचार केला पाहिजे. केवळ साक्षीपुराव्याचा विचार न करतां न्यायाधीशांनीं लिखाण स्वत: वाचून आपलें मत बनविण्याचा त्यांना अधिकार आहे असें या निकालपत्रांत म्हटलें आहे.

अनीति अथवा अश्लीलता यांची स्थलकालनिरपेक्ष सर्वमान्य अशी शाश्वत व्याख्या अशक्य आहे याची दखल पंजाब हायकोर्टानें पंजाबराज्य वि. दीनानाथ ( १९५६, क्रि. लॉ. ज. ४१५ ) या खटल्यांत घेतली आहे. ‘ मुनव्वर ’ या नियतकालिकांतील एक लेख अश्लील आहे असें सरकारचें म्हणणें होतें. परंतु तो लेख म्हणजे इतर पुस्तकांतील उतारे व चित्रें यांचें पुनर्मुद्रण आहे असा अभिप्राय हायकोर्टानें दिला. कायद्याच्या दृष्टीनें या निर्णयांतील महत्त्वाचा भाग म्हणजे पिनल कोडचें २९२ कलम आणि १९५१ चा कायदा यांत कांहींहि विसंगति नाहीं असें हायकोर्टानें ठरविलें. आणि अश्लील लिखाण प्रसिद्ध करणें हा २९२ कलमान्वयें गुन्हा ठरतो, तर दुसऱ्यांदा छापणें हा १९५१ च्या कायद्यानें गुन्हा ठरतो, असा या दोन कायद्यांतील फरक आहे असें मत व्यक्त केलें.

‘ सिनेमा नेसन ’ या मद्रासमधील साप्ताहिकांत सिनेतारकांविषयीं एक लेख प्रसिद्ध झाला होता. आणि त्यांत सिनेमांतील नट्यांचे अनेक लोकांशीं संबंध असतात हें दर्शवून त्या वेश्या आहेत असें सूचित केलें होतें. हें लिखाण अब्रूनुकसानीकारक, ओंगळ, घाणेरडें आणि असभ्य आहे असें मान्य करूनहि तें अश्लील नाहीं असा निर्णय मद्रास हायकोर्टानें १९५८ सालीं पब्लिक प्रॉसिक्यूटर वि. ए. डी. सभापति ( १९५८ क्रि. लॉ. ज. ६४७ ) या खटल्यांत दिला. असभ्य ( Indecent ) म्हणजे अश्लील ( Obscene ) नव्हे असें मत हायकोर्टानें व्यक्त केलें आहे. याउलट १९५९ सालीं अलाहाबाद हायकोर्टानें कनिष्ठ न्यायालयाचा निर्णय चुकीचा ठरवून ‘ असली कोकशास्त्र ’ प्रसिद्ध केल्याबद्दल आरोपीस शिक्षा केली. या पुस्तकांत लैंगिक गोष्टींची माहिती देण्यांत आली होती. आरोपीचा बचाव असा होता कीं, या पुस्तकांतील आक्षेपार्ह भाग श्री देवराज महाराज यांनीं लिहिलेल्या ‘ रतिरत्नप्रदीपिका ’ या ग्रंथांतून घेतलेले आहेत. म्हैसूर

ओरिएंटल लायब्ररीचे ग्रंथपाल पंडित के. रंगास्वामी अयंगार यांनीं या ग्रंथाचें इंग्रजींत भाषान्तर केलेलें आहे. परंतु हा बचाव हायकोर्टानें अमान्य केला. कारण अयंगार यांचें भाषान्तर खाजगी रीत्या वांटण्यासाठींच होतें, विक्रीसाठीं नव्हतें. आरोपीचा दुसरा बचाव असा होता कीं, याच प्रकारचें लिखाण वात्स्यायनाचें कामसूत्र व त्रिदिबनाथ रे यांच्या कल्याणमल्लार 'अनंगरंग' या पुस्तकांतून आढळतें. पहिल्या पुस्तकाचे भाषान्तरकार डॉ.बी. एन्. बसू यांनीं प्रस्तावनेंत स्पष्ट लिहिलें आहे कीं, "हें पुस्तक फक्त डॉक्टर, वकील आणि मानसशास्त्र व समाजशास्त्र यांच्या अभ्यासकांसाठींच आहे." आणि दुसऱ्या कोणास तें विकूं नये असा इशाराहि देण्यांत आला होता. दुसऱ्या पुस्तकाची विक्रीहि मर्यादित करण्यांत आली होती. म्हणून हा बचावहि अमान्य झाला. या खटल्यांत आरोपीनें कलकत्ता आणि बनारस या विद्यापीठांतील संस्कृतच्या एका परीक्षकांची साक्ष काढली होती, आणि त्यांनीं तें पुस्तक अश्लील नाहीं असें मत दिलें होतें. परंतु न्यायालयानें तें स्वीकारलें नाहीं. आश्चर्य म्हणजे अश्लील समजला जाणारा जवळजवळ सर्व भाग या निकालपत्रांत उद्धृत केला आहे. राज्य वि. ठाकूरप्रसाद (ए. आय्. आर. १९५९, अलाहाबाद ४९).

अश्लीलतेसंबंधींचे अगदीं अलीकडचे दोन निर्णय म्हणजे सी. टी. प्रीम (१९६१ कलकत्ता १७७) आणि झफर अहमदखान (१९६३ अलाहाबाद १०५) या खटल्यांतले. पहिल्या खटल्यांत कलकत्त्यांतील एका दुकानदारावर 'डार्क अर्न', 'शेम ऑफ मेरी क्वीन', 'फाइंड मी इन फायर' हीं तीन अश्लील पुस्तकें विकल्याबद्दल खटला भरण्यांत आला होता. कलकत्ता हायकोर्टानें या खटल्यांत चार महत्त्वाचे निर्णय दिले आहेत. (१) २९२ कलमान्वयें आरोपीनें गुन्हा केला आहे हें सिद्ध करण्यासाठीं गुन्हा करण्याचा त्याचा हेतु (मेन्सरिआ) होता हें सिद्ध केलें पाहिजे. या गुन्ह्यास तीन महिन्यांची शिक्षा आहे. म्हणून आरोपीचें व्यक्तिस्वातंत्र्य हिरावून घेण्यापूर्वी त्याचा गुन्हा — त्याच्या आईनें त्याच्या लहानपणीं त्याच्यावर इतकें वर्चस्व गाजवलेलें असतें कीं, त्याचा व्यक्तिविकास होत नाहीं. म्हणून मोठेपणीं तो स्वतःची बायको व इतर स्त्रिया यांना क्रूरतेनें वागवतो, आणि विकृत मनोवृत्तीनें त्यांची शारीरिक मारहाण व छळ करूनच आपली विषय-

वासना पुरी करतो, असें या कादंबरीचें कथानक होतें. गोष्टीच्या शेवटीं तो आत्महत्त्या करतो असें दाखविलें होतें. परंतु शारीरिक छळाचीं आणि संभोगाचीं वर्णनें अश्लील असल्यामुळें लेखकाचा हेतु अगर उद्देश विचारार्ह नाहीं असें हायकोर्टानें ठरविलें. दुसऱ्या पुस्तकांतील कथा बहीणभावांच्या संबंधाची होती. बापाच्या मृत्यूनंतर त्यांची आई दारुडी होते, आणि मुलांची हेळसांड करूं लागते. यामुळें बहीणभावांत आकर्षण निर्माण होतें. भाऊ शेवटीं धर्मोपदेशक बनतो, परंतु बहिणीचें स्वैर जीवन चालूच राहतें. अखेर तीं एका चर्चमध्यें भेटतात आणि बहीण ही आपल्या जीवनांतील दुःखाला कारणीभूत आहे असें समजून तो तिचा खून करतो. असे संबंध समाजांत असतात, आणि हा एक सामाजिक प्रश्न आहे हें हायकोर्टानें मान्य केलें. परंतु गुन्हा करण्याचा हेतु सिद्ध केला पाहिजे. ( २ ) एखाद्या पुस्तकांतील एक परिच्छेद जरी अश्लील असला तरी सर्व पुस्तक अश्लील ठरवितां येतें. ( ३ ) पाश्चात्य देशांतील सध्यांच्या जीवनाचें चित्र रेखाटण्याच्या उद्देशानें लिखाण केलें आहे हा बचाव स्वीकारतां येणार नाहीं, कारण इतर देशांतील सामाजिक जीवनाचा वाईट भाग हिंदुस्थानांतील लोकांच्या नजरेला आणण्याची कांहींहि आवश्यकता नाहीं. आणि ( ४ ) चांगला हेतु किंवा उद्देश ज्याप्रमाणें कायदेशीर बचाव ठरत नाहीं, त्याचप्रमाणें इतर आक्षेपार्ह पुस्तकांवर बंदी घातलेली नाहीं हा बचावसुद्धां स्वीकारार्ह ठरत नाहीं.

पहिल्या मुद्द्याचें विवरण करतांना हायकोर्टानें म्हटलें आहे कीं, समजा, एका आंधळ्या माणसानें अश्लील पुस्तक विकलें तर गुन्हा करण्याचा त्याचा हेतु आहे असें म्हणतां येणार नाहीं. याउलट विक्रेता निरक्षर आहे किंवा त्याला ज्या भाषेंत पुस्तक लिहिलें आहे ती भाषा येत नाहीं, येवढ्यावरून त्याचा गुन्हा करण्याचा हेतु नव्हता असें म्हणतां येणार नाहीं. पहिल्या पुस्तकाच्या नायकाला त्याच्या लहानपणीं त्याच्या वडिलांनीं फार क्रूरतेनें वागविलें होतें, आणि पुस्तक वाचल्यानंतर त्याबद्दल घृणा निर्माण होत नाहीं. उलट त्यांतील वर्णनांमुळें तें कामभावना उद्दीपित करतें, म्हणून तें अश्लील ठरतें असा निर्णय देण्यांत आला.

तिसऱ्या पुस्तकाचा नायक एक सैनिक असतो. युद्धांत तो जायबंदी

९३६९०

होतो व त्याला एक कृत्रिम अवयव बसविण्यांत येतो. परत आल्यावर एका शाळकरी मुलीला तो वश करतो, आणि एका स्मशानांत तिचें कौमार्यभंग करतो. त्यानंतर त्याचा एका ज्यू तरुणीशीं संबंध येतो. मनानें कुढणारी ही तरुणी मानसिक यातनांतून सुटकेचा उपाय म्हणून नायकाबरोबर संबंध ठेवते. एकाकी विनाधार तरुणतरुणींमुळें युद्धोत्तर युरोपमध्यें एक मोठा सामाजिक प्रश्न निर्माण झाला होता; आणि या प्रश्नाला तरुणतरुणी जर भिन्न वंशांच्या असल्या तर विशेष धार आली होती. या सामाजिक सत्याचें चित्रण या कादंबरींत आहे, हा आरोपीचा बचाव कोर्टानें अमान्य केला. कारण नायिकांच्या शरीराचीं वर्णनें या सामाजिक समस्येच्या विश्लेषणासाठीं अनावश्यक होतीं.

१९६३ सालीं लखनौमध्यें दोन तरुणींचा रिक्षांमध्यें पाठलाग करून त्यांच्याबद्दल अश्लील उद्गार काढले, असा आरोप दुसऱ्या खटल्यांतील आरोपीवर ठेवण्यांत आला होता. आरोपी त्या दोन तरुणींना म्हणाला होता कीं, "आवो मेरी जान, मेरी रिक्षेपर बैठ जाओ। मैं तुमको पहूंचा दूँगा। मैं तुम्हारा इंतजार कर रहा हूँ।" दोन्ही तरुणी सुमारें १८ वर्षांच्या होत्या. घरंदाज मुसलमान कुळांतल्या होत्या. त्यांची व आरोपीची पूर्वी ओळखहि नव्हती. यामुळें त्यानें वापरलेली भाषा शृंगारिक होती आणि त्यांतून अनैतिक शारीरिक संबंध सूचित केला होता असें मत न्यायालयानें दिलें. आरोपीनें वापरलेले ते शब्द त्या तरुणीचा विनयभंग करणारे, असभ्य, कामुक आणि ओंगळ होते, म्हणून त्याचें तें कृत्य अश्लील कृत्य ठरतें असा निर्णय हायकोर्टानें दिला !

अर्थात् गेल्या कांहीं वर्षांतील सर्वांत महत्त्वाचा निर्णय म्हणजे मुंबई हायकोर्टानें लेडी चॅटर्लीज लव्हर ही कादंबरी अश्लील ठरविली आहे. त्याचा विचार स्वतंत्ररीत्या केला आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत
३६५२२ वि: मिवंद
२५५५ नों दि: ६/५/६५

## ७ : लेडी चॅटर्लीज लव्हर

अश्लीलतेसंबंधींच्या कायद्याला नवें वळण लावण्याचें श्रेय डी. एच्. लॉरेन्सच्या ' लेडी चॅटर्लीज लव्हर ' या कादंबरीला आहे. या विसाव्या शतकांतील श्रेष्ठ कादंबरीकारांत डी.एच्. लॉरेन्स याची गणना होते. त्याच्या या कादंबरीनें सर्वत्र खळबळ उडवून दिली. फ्लॉरेन्समध्यें राहात असतांना लॉरेन्सनें ही कादंबरी १९२६ सालीं लिहिण्यास सुरुवात केली. ऑक्टोबर १९२६ ते जानेवारी १९२८ या कालखंडांत त्यानें ही कादंबरी तीनदां वेगवेगळ्या प्रकारें लिहून काढली. लॉरेन्सच्या सर्व कलाकृतींत आढळून येणारें त्याचें जीवनविषयक तत्त्वज्ञान आणि नैतिक दृष्टिकोन याहि कादंबरींत अभिप्रेत आहे. लैंगिक विषयासंबंधीं त्याचीं मतें या कादंबरींतहि अध्याहृत आहेत. परंतु संभोगाचीं त्यानें केलेलीं वर्णनें, आणि संभोगद्योतक वापरलेला शब्द-ज्याला इंग्रजींत ' फोर लेटर वर्ड ' असें म्हटलें जातें यामुळें ही कादंबरी अश्लील आहे असा बोभाटा झाला. या कादंबरीची पहिली आवृत्ति जुलै १९२८ मध्यें फ्लॉरेन्सहून प्रसिद्ध झाली. यानंतर त्याच्या अनेक अनधिकृत आवृत्त्या प्रसिद्ध होऊं लागल्या. म्हणून त्यानें पॅरिसहून १९२९ सालीं आणखी एक आवृत्ति प्रसिद्ध केली. त्यानंतर अनेक वर्षे अशा आवृत्त्या प्रसिद्ध होत होत्या, आणि इंग्लंड व अमेरिकेंत त्या जप्त होत होत्या.

तसें पाहिलें तर ही कांहीं लॉरेन्सची सर्वोत्कृष्ट कादंबरी नव्हे. कथासूत्रहि कांहीं नवीन नाहीं. कॉन्स्टन्स ही या कादंबरीची नायिका. विद्यार्थि-

दशेंत ती अत्यंत स्वतंत्रपणें आणि स्वैरपणें वागलेली असते. लग्नापूर्वी कांहीं दिवस तिनें युरोपमध्यें घालवलेले असतात, आणि अनेक पुरुषांशीं तिचा संबंध आलेला असतो. युद्धकालांत रजेवर आलेल्या एका खानदानी तरुणाशीं तिचा विवाह होतो. इंग्लंडमधील सामाजिक जीवनांत त्याचें घराणें तिच्या घराण्यापेक्षां श्रेष्ठ समजलें जाणारें असें असतें. लग्नानंतर एक महिन्यानें परत युद्धावर जावें लागतें, आणि सहा महिन्यांनंतर तो जखमी होऊन परत येतो. कमरेखालचा त्याचा भाग अर्धांगामुळें निकामी होतो. पत्नीचीं कर्तव्यें ती पूर्णपणें पार पाडते. नवऱ्याची उत्कृष्ट सेवा करते. परंतु कांहीं कालानंतर तिच्यामध्यें वैफल्याची भावना निर्माण होते, आणि तत्कालीन सामाजिक कल्पनांविरुद्ध ती एक प्रकारचें बंड करते. नवऱ्याच्या एका मित्राबरोबर तिचा प्रथम संबंध येतो. त्यानंतर घरांतील एका नोकराबरोबर तिचा संबंध येतो. या संबंधामुळें शारीरिक दृष्टया तिला सुख आणि समाधान मिळतें, आणि ती गरोदर होते. खानदानी घराण्यांतील एका स्त्रीचा तिच्या नोकराबरोबर संबंध यावा ही घटनाच कांहींशी धक्का देणारी आहे. त्यांत पुन्हा लॉरेन्सनें त्या दोघांच्या लैंगिक जीवनाचें आणि संभोगाचें बारीकसारीक वर्णन केलें आहे. संभोगाच्या क्रियेचें वर्णन करणाऱ्या इंग्रजींतील एका चार अक्षरी ग्राम्य शब्दाचा – ज्याला इंग्रजींत 'फोर लेटर वर्ड' असें म्हणतात – लॉरेन्सनें मुक्तहस्तानें वापर केला आहे. शिवाय एका ठिकाणीं नायिकेचे वडील या विवाहबाह्य संबंधाचें समर्थन करतात असें दाखविलें आहे.

एकाच कादंबरींत नैतिक कल्पनांना धक्का देणाऱ्या इतक्या गोष्टी असल्यानंतर ती अश्लील आहे असा बोभाटा होणें स्वाभाविक होतें. परंतु १९५९ सालीं लॉरेन्सच्या पत्नीची संमति घेऊन न्यूयॉर्कच्या गोव्ह प्रेसनें धाडस केलें आणि ही कादंबरी जशीच्या तशी प्रसिद्ध केली. अमेरिकेंतील एक ख्यातनाम टीकाकार आणि काँग्रेसचे ग्रंथपाल आर्चिबाल्ड मॅकलिश, आणि कॅलिफोर्निया विद्यापिठांतील इंग्रजीचे प्राध्यापक मार्कशोरर यांनीं तिला प्रस्तावना लिहिली आहे. तेथील पोस्टखात्यानें ती अश्लील आहे या सबबीवर पोस्टानें तिच्या प्रती पाठविण्यास बंदी घातली. प्रकाशकांनीं प्रकरण न्यायालयांत नेलें, आणि २१ जुलै १९५९ रोजीं फेडरल न्यायाधीश ब्रायन यांनीं कादंबरी अश्लील

नाहीं असा निर्णय दिला ! या निकालपत्रांत त्यांनीं म्हटलें आहे कीं, ( १ ) सर्व पुस्तकाचा परिणाम काय होतो हें पाहिलें पाहिजे. ( २ ) लैंगिक भावना उद्दीपित व्हाव्यात असा परिणाम होत नाहीं. ( ३ ) लेखकाची शैली सुंदर आहे;–आणि कांहीं वर्णनें तर अप्रतिम आहेत. कादंबरींत अनेक साहित्यगुण आहेत याबद्दल शंकासुद्धां घेतां येणार नाहीं. ( ४ ) कादंबरीचा उद्देश हेतु आणि परिणाम लैंगिक भावना उद्दीपित करण्याचा नाहीं. केवळ घाणीसाठीं घाण ( डर्ट फॉर डर्टस् सेक ) म्हणून ही कादंबरी लिहिलेली नाहीं. आणि ( ५ ) ज्या पद्धतीनें कादंबरी लिहिली आहे त्यावरून लेखकाची कळकळ आणि प्रामाणिकपणा स्पष्ट होतो. या निर्णयाविरुद्ध पोस्टखात्यानें अपील केलें, आणि २५ मार्च १९६० रोजीं अपीलकोर्टानें हा निर्णय कायम केला. न्यूयॉर्क अपीलकोर्टाचे सरन्यायाधीश चार्लस् क्लार्क यांनीं आपल्या निकालपत्रांत म्हटलें आहे कीं, एकदां लैंगिक गोष्टीबद्दल लिहिण्यासंबंधींच्या आपल्या कल्पना बदलल्या आहेत हें लक्षांत घेतलें म्हणजे लॉरेन्सचें लिखाण किती उच्च भावना हेलावून सोडणारें आहे याची कल्पना येते.

या निर्णयाचें जवळ जवळ सर्व वृत्तपत्रांनीं स्वागत केलें. एपिस्कोपल पंथाच्या ' लिव्हिंग चर्च ' या धार्मिक पत्रानेंसुद्धां या निर्णयाचें समर्थन केलें, आणि पालकांव्यतिरिक्त इतर कोणीहि घातलेलीं बंधनें (सेन्सॉरशिप) अयोग्य आहेत असें मत व्यक्त केलें आहे.

इंग्लंडमध्यें १९५९ सालीं अश्लीलतेबद्दल नवीन कायदा पास झाला. त्यापूर्वी १९५३ सालीं आक्षेपार्ह भाग गाळून टाकलेली कादंबरीसुद्धां लंडनच्या एका मॅजिस्ट्रेटनें अश्लील ठरविली होती. परंतु १९६० सालीं पेंग्विन या प्रख्यात प्रकाशनसंस्थेनें ही कादंबरी संपूर्ण छापण्याचें ठरविलें. त्यांचे नेहमींचे मुद्रक ती छापण्यास तयार होईनात, म्हणून दुसऱ्या एका छापखान्यांत त्यांनीं ती छापून घेतली, आणि ती प्रसिद्ध करण्यापूर्वी कांहीं प्रती पोलिसांकडे पाठविल्या. पोलिसांनीं नवीन कायद्यान्वयें रीतसर खटला भरला; आणि २१ ऑक्टोबर १९६० रोजीं खटला सुरू झाला. त्यापूर्वीच कांहीं दिवस अगोदर साउथएन्डच्या मॅजिस्ट्रेटनें कादंबरी अश्लील आहे असा निर्णय दिला होता !

सरकारतर्फें असें सांगण्यांत आलें कीं, या कादंबरींत १२ आक्षेपार्ह वर्णनें आहेत. शारीरिक सुख, वासना, आणि कामुकता या गोष्टींवरच भर दिलेला आहे. आक्षेपार्ह चार अक्षरी शब्द ३० वेळां वापरलेला आहे. प्रकाशकांतर्फें ३५ साक्षीदारांच्या साक्षी घेण्यांत आल्या. आणखी ३६ साक्षीदारांची यादी तयार होती, परंतु त्यांच्या साक्षी घेतल्या नाहींत. निरनिराळ्या क्षेत्रांतील व्यक्तींनीं साक्षी दिल्या. हेलेन गार्डनर, रिबेका वेस्ट, वुलत्रिचचे विशप, प्रा. विव्हियन पिंटो, आर्ट कौन्सिलचे चिटणीस विल्यम्स, रिचर्ड होगार्ट, इ. एम्. फॉस्टर, रॉय जेन्किन्स, नॉर्मन जॉन स्टिव्हस, सर ॲलन लेन, सर स्टॅन्ले अनविन, डिलिस पॉवेल, सेसिल डे, ल्युइस वगैरे कवि, नाटककार, चित्रकार, साहित्यिक, समीक्षक, टीकाकार, संसदेचे सभासद, प्रकाशक वगैरे बहुविध क्षेत्रांतील लोकांच्या साक्षी झाल्या.

हा खटला ज्यूरीपुढें चालला. ज्यूरींनीं पुस्तक न्यायालयांतच वाचलें पाहिजे असा निर्णय न्यायाधीशांनीं दिला. त्याप्रमाणें ज्यूरींनीं तें वाचलें, आणि तज्ज्ञांचा पुरावा संपल्यानंतर न्यायाधीशांनीं ज्यूरींना आदेश दिला. या आदेशांत त्यांनीं सांगितलें:—

( १ ) पुस्तकाचे संभाव्य वाचक तें वाचून नैतिकदृष्ट्या भ्रष्ट किंवा विकृत होणें संभवत असेल तर पुस्तक अश्लील आहे असें समजलें पाहिजे. ( २ ) लेखकाचा हेतु लक्षांत घेण्याचें कारण नाहीं. ( ३ ) तज्ज्ञ किंवा साहित्याचे टीकाकार किंवा अभ्यासू यांच्यावर काय परिणाम होईल याचा विचार करावयाचा नाहीं, तर सर्वसामान्य वाचक म्हणजे जो कामावर असतांना जेवणाच्या सुट्टींत एखादें पुस्तक वाचतो आणि नंतर काम संपल्यावर घरीं जाऊन तें पुरें करतो, अशा वाचकावर काय परिणाम होईल याचा विचार केला पाहिजे. ( ४ ) सध्यांच्या दिवसांत इंग्लंडमध्यें पगार आणि रोजगार वाढला आहे. पॉकेटमनीहि वाढला आहे. आणि पुस्तकाची किंमत तर साडेतीन शिलिंगच आहे. यामुळें लक्षावधि लोक तें वाचूं शकतील याचाहि विचार केला पाहिजे.

पांच दिवस खटला चालला, आणि २ नोव्हेंबरला तीन तास विचार केल्यानंतर ज्यूरीनें कादंबरी अश्लील नाहीं असा निर्णय दिला! टाइम्सखेरीज इतर वृत्तपत्रांनीं या निर्णयाचें स्वागत केलें. कॅन्टरबरीचे आर्चबिशप आणि

हेरेफर्डचे बिशप यांना मात्र हा निर्णय पसंत पडला नाहीं. गार्डियन आणि ऑब्झर्व्हरनें चार अक्षरी शब्द उद्धृत केल्याबद्दल कांहीं लोकांनीं टीका केली. ऑक्सफर्ड शब्दकोशकारांनीं यापुढील आवृत्तींत हे शब्द येणार नाहींत असें जाहीर केलें! बहुसंख्य इंग्लिश लोकांना काय वाटलें असावें हें लॉरेन्सच्या सावत्र मुलीनें– बार्बारा बार हिनें सांगितलें –" सबंध इंग्लंडभर आतां कशी हवा स्वच्छ झाली असें वाटूं लागलें आहे."

असाच एक खटला ऑगस्ट १९६३ मध्यें न्यूयॉर्कमध्यें गाजला. १८ व्या शतकांत जॉन क्लिलँड यानें लिहिलेलें 'मेमॉयर्स ऑफ ए वूमन ऑफ प्लेझर' हें पुस्तक 'लेडी चॅटर्लीज लव्हर' या कादंबरीप्रमाणेंच अनेक वर्षे अश्लील म्हणून जप्त केलें जात होतें. इंग्लंडपेक्षां अमेरिकेंतील लोकमत, कायदा आणि न्यायालयें अधिक पुरोगामी आहेत. १९५७ सालीं तेथील सुप्रीम कोर्टानें रॉथ वि. युनायटेड स्टेट्स (१९५७) १ लॉ १४९८ या निर्णयांत 'हिकलीन कसोटी' अग्रयावत् नाहीं असें ठरविलें, आणि सद्यःकालीन सामाजिक कल्पनांचा विचार करूनच कोणतेंहि लिखाण अश्लील आहे किंवा नाहीं हें ठरवावें असा निर्णय दिला. लिखाणांत सामाजिक मूल्यें कांहींहि नसतील तरच तें अश्लील ठरतें असेंहि मत व्यक्त केलें होतें. या निर्णयानंतर पटनम आणि कंपनी या संस्थेनें हें दोनशें वर्षांचें जुनें पुस्तक प्रसिद्ध केलें होतें.

न्यूयॉर्कमधील अधिकाऱ्यांनीं नेहमींप्रमाणें प्रकाशकावर फौजदारी खटला न भरतां दिवाणी दावा लावला, आणि पुस्तकाची विक्री करूं नये असा मनाई हुकूम प्रकाशकाविरुद्ध काढावा अशी मागणी केली. प्रकाशकातर्फे न्यूयॉर्क टाइम्सच्या साहित्यिक विभागाचे संपादक डोनाल्ड ॲडाम्स, येल विद्यापीठाचे प्राध्यापक जॉन हॉलेंडर, कवि लुई अटरमेयर, इलियट फ्रेमाँ स्मिथ, आणि कोलंबिया विद्यापीठाचे एरिक बेंटले यांनीं साक्षी दिल्या.

फिर्यादीच्या वकिलानें सांगितलें कीं, या पुस्तकांत संभोगाचीं वीस वर्णनें आहेत. त्यांपैकीं चार वर्णनें तर संभोग इतरांच्या देखत केल्याचीं आहेत. पुरुषांतील समलिंगी संभोगाचीं दोन, आणि स्त्रियांतील समलिंगी संभोगाचीं चार वर्णनें आहेत. हस्तमैथुन आणि विकृत संभोग यांचींहि वर्णनें आहेत. अशीं वर्णनें असलेलें पुस्तक अश्लील नाहीं तर काय म्हणणार?

फिर्यादीतर्फे रोमन कॅथॉलिक पंथाचे एक धर्मोपदेशक आणि ज्यू धर्माचे एक धर्मगुरु यांच्या साक्षी झाल्या. शेवटचे साक्षीदार एपिस्कोपेलियन पंथाचे धर्मोपदेशक होते. परंतु त्यांनीं सांगितलें कीं, पहाटे चार वाजेपर्यंत मीं हें पुस्तक वाचलें, आणि मला आतां तें अश्लील वाटत नाहीं! कारण त्यांत तत्कालीन समाजाचें चित्र आहे,–आणि समाजशास्त्राच्या विद्यार्थ्याला तें उपयोगीं पडेल!

दोन दिवसांनंतर न्यायाधीश ऑर्थर क्लिन यांनीं पुस्तक अश्लील नाहीं असा निर्णय दिला. पुस्तकाची नायिका फॅनी हिल हिचें चारित्र्य कसें होतें हा प्रश्न महत्त्वाचा नाहीं. "ती एक ऐतिहासिक कादंबरी आहे, आणि तिच्यांत वाङ्मयीन गुणहि आहेत. सद्यःकालीन सामाजिक कल्पनांचा विचार करूनच कादंबरी अश्लील आहे किंवा नाहीं हें ठरविलें पाहिजे. सध्यां अमेरिकेंतील वृत्तपत्रांच्या पहिल्या पानावर इंग्लंडमधील प्रोफ्युमो किंवा तत्सम प्रकरणांतील घटनांचीं जीं वर्णनें येत आहेत त्यापेक्षां फॅनी हिलचे अनुभव कांहीं वेगळे नाहींत. सद्यःकालीन सामाजिक कल्पनांची कसोटी लावली तर ही कादंबरी अश्लील ठरणार नाहीं. अर्थात् माझ्या लहान मुलीनें ही कादंबरी वाचूं नये अशी माझी इच्छा आहे. परंतु लहान मुलांच्या हातांत एखादें पुस्तक पडूं नये म्हणून त्यावर बंदी घालण्याचें ठरविलें, तर सुप्रीम कोर्टानें म्हटल्याप्रमाणें सर्वांनीं लहान मुलांचीं पुस्तकेंच फक्त वाचावींत असा कायदा होईल. फॅनी हिल जर सध्यांच्या जगांत पुन्हा जन्माला आली तर तिला नवीन कांहीं वाटणार नाहीं. उलट सध्यां जें चाललें आहे तें पाहून ती कदाचित् लाजेल!"

इंग्लंड आणि अमेरिकेंत असे निर्णय दिले जात असतांना हिंदुस्थानांत मात्र लेडी चॅटर्लीज लव्हर अश्लील ठरली आहे. मुंबईतील एका पुस्तक-विक्रेत्यावर ही कादंबरी विकल्याबद्दल इंडियन पिनल कोडाच्या २९२ कलमान्वयें पोलिसांनीं खटला भरला. प्रेसिडेन्सी मॅजिस्ट्रेटनें ती अश्लील ठरविली, आणि आरोपीनें हायकोर्टाकडे फेरतपासणीचा अर्ज केला. हाय-कोर्टानें ६ फेब्रुआरी १९६२ रोजीं ही कादंबरी अश्लील आहे असा निर्णय दिला (६४ बॉम्बे लॉ. रि. ३५६). हायकोर्टानें दिलेलीं कारणें अशीं आहेत.–(१) हिकलीन कसोटी अजूनहि इंग्लंडमध्यें त्याज्य ठरलेली नाहीं.

न्या. मू. स्टेबल यांनीं १९५४ सालीं या कसोटींत बदल केला हें म्हणणें खरें नाहीं. हिंदुस्थानांतील सर्व न्यायालयांनीं हिकलीन कसोटी स्वीकारलेली आहे. ( २ ) एखाद्या पुस्तकांतील निवडक भाग न पाहतां सर्व पुस्तकाचा परिणाम काय होतो हें पाहावें ही कसोटी इंग्लंडमध्येंसुद्धां सर्वमान्य झालेली नाहीं. न्या. मू. स्टेबल यांच्या निर्णयापूर्वी पेजेट वि. वॉटसन (१९५२-१ ऑ. इं. रि. १२५६ ) या खटल्यांत ही कसोटी मान्य केलेली नव्हती. ( ३ ) इंग्लंडमध्यें १९५९ सालीं अश्लीलतेबद्दल नवीन कायदा झाला आहे. तसा कायदा हिंदुस्थानांत नाहीं. ( ४ ) अमेरिकेच्या सुप्रीम कोर्टाचा १९५७ चा रॉथच्या खटल्यांतील निर्णय हिंदुस्थानांत लागू पडत नाहीं. कारण तो निर्णय अमेरिकेच्या घटनेच्या संदर्भांत दिलेला होता. उलट पुस्तकांतील एक भाग जरी अश्लील असला तरी सर्व पुस्तक अश्लील ठरतें असे निर्णय हिंदुस्थानांतील न्यायालयांनीं सतत दिलेले आहेत. ( ५ ) सर्व पुस्तकाचा परिणाम पाहावा ही कसोटी स्वीकारण्यांत धोका आहे. कारण एखादें पुस्तक कितीहि चांगलें असलें, तरी त्यांतील अश्लील भागानें वाचक नैतिकदृष्ट्या भ्रष्ट होण्याची शक्यता आहे. ( ६ ) पुस्तकाचा परिणाम तरुणांवर काय होईल हें पाहणें आवश्यक आहे. कारण या देशांतील इंग्लिश वाचणाऱ्या वाचकवर्गांपैकीं कित्येक वाचक तरुण असतात. ( ७ ) आपल्या घटनेच्या १९ व्या कलमांत म्हणजे व्यक्तिस्वातंत्र्याच्या कलमांत अश्लीलतेची वेगळी व्याख्या केलेली नाहीं हें लक्षांत घेतलें पाहिजे. ( ८ ) मॅकलिश आणि शोअरर यांच्या प्रस्तावना आणि लॉरेन्सचीं पत्रें यांवरून लॉरेन्सचा हेतु काय होता हें स्पष्ट होत नाहीं. होत असलाच तर लॉरेन्सच्या पत्रावरून असें दिसतें कीं, लिंग-संप्रदायाचा तो भोक्ता होता. ( ९ ) चार अक्षरी शब्द हिंदी, मराठी किंवा गुजराथी भाषेंतील कादंबऱ्यांत क्वचित् आढळतात. ( १० ) हें पुस्तक कॉलेजांतील प्राध्यापक आणि साहित्याचे विद्यार्थींच फक्त वाचतील असें समजतां येणार नाहीं. ( ११ ) ही कादंबरी वाचल्यानंतर सर्वसामान्य वाचकाला असेंच वाटेल कीं, कॉन्स्टन्ससारख्या स्त्रीनें मेलर्ससारख्या नोकराबरोबर संबंध ठेवून शारीरिक सुख घ्यावें असें लेखकाला सांगावयाचें आहे, आणि ही गोष्ट सामाजिक नीति भ्रष्ट करणारी आहे. ( १२ ) कादंबरींतील आक्षेपार्ह भाग वाचल्यानंतर सर्वसामान्य वाचकाच्या

मनांत कामुक भावना निर्माण होतील; आणि नैतिकदृष्ट्या तो भ्रष्ट होईल. ( १३ ) कादंबरीची किंमत ३५ सेंटस् आहे. कॉलेजचे विद्यार्थी ती विकत घेण्याची शक्यता आहे. अशा विद्यार्थ्यांना इंग्रजी भाषा कळते, परंतु साहित्य कळत नाहीं. त्यांच्यावर या कादंबरीचा वाईट परिणाम होण्याची शक्यता आहे. ( १४ ) इंग्लंड–अमेरिकेंत कादंबरी अश्लील नाहीं असें ठरलें असेल, परंतु तेथील सर्वसामान्य माणसाची हिंदुस्थानांतील सर्व-सामान्य माणसाशीं तुलना करतां येणार नाहीं.

भारतीय कायद्याच्या या समालोचनावरून कांहीं निष्कर्ष काढतां येतील. इंग्लंडमध्यें १९५९ पूर्वी तज्ज्ञांचा पुरावा सादर करतां येत नसे. परंतु भारतांत तसा पुरावा फार पूर्वीपासून सादर करतां येत असे. कोणत्या परिस्थितींत, कोणत्या कालांत, कोणत्या ठिकाणीं लिखाण केलें याचा विचार भारतीय न्यायालयें करीत नाहींत. हेतु आणि उद्देश विचारांत घेतले जात नाहींत. बुद्धिपुरस्सर अश्लील लिहिलें आहे किंवा नाहीं याचा विचार होत नाहीं. अश्लीलतेंतहि कांहीं वाङ्मयीन गुण किंवा कलात्मकता आहे का याचा शोध केला जात नाहीं. १०० वर्षांपूर्वीची हिकलीन कसोटी जवळ जवळ अंधपणें स्वीकारली जाते. बदललेल्या सामाजिक कल्पना आणि बदलतीं मूल्यें यांची दखल घेतली जात नाहीं. या देशांत इंग्रजी वाचतां येणारे लोक फक्त एक टक्का आहेत, साक्षरता १२ टक्क्यांपेक्षां जास्त नाहीं, पुस्तकाची विक्री अत्यल्प आहे, इत्यादि गोष्टी तर मुळींच लक्षांत घेतल्या जात नाहींत. भारतांतील लोकसंख्येंतील स्त्री आणि पुरुष यांचें प्रमाण, लवकर लग्न करण्याची पद्धत, एकत्रकुटुंबपद्धति, नागरी आणि ग्रामीण जीवनांतील फरक इत्यादि आर्थिक आणि सामाजिक गोष्टींचा उल्लेख तर अभावानें आढळतो. आणि विशेषतः या देशांतील धार्मिक आणि सामाजिक दृष्टिकोन आणि जीवनविषयक तत्त्वज्ञान यांचा तर मागमूसहि या कायद्यांत सांपडत नाहीं.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत
३५४२२ दि. १७/१०/६१
१३७६०

REFBK-0013760
REFBK-0013760

## न. वि. गाडगीळ यांची पुस्तकें

राज्यशास्त्र विचार

राज्यव्यवहार विचार

राज्यकारभार विचार

विधिशास्त्र विचार

घटना प्रबोधिनी

राज्योपनिषद्

आधुनिक राज्य व स्वातंत्र्य

मध्यवर्ति कायदेमंडळांतील सहा वर्षें

लाल किल्ल्याच्या छायेंत

ग्यानबाचे अर्थशास्त्र

हिंदी अंदाजपत्रकें

सभाशास्त्र

वक्तृत्वशास्त्र

ललित

सालगुदस्त

अनगड मोती

अष्टग्रहांतील नववा

माझा येळकोट

पाव आणि मिसळ

चरित्रविषयक

माझे समकालीन

कांहीं मोती आणि कांहीं मोहरा

शिखांचा इतिहास

संकलित

पथिक–आत्मचरित्र

पंजाबांतील हद्दपारी

◆

व्हीनस प्रकाशन
“ तपश्चर्या ”
३८१, क, शनवार पेठ, पुणें २.